
# चला जाऊया गोष्टींच्या गावा!





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.


**चला जाऊया गोष्टींच्या गावा!**

- **प्रेरणा :**
  **मा. ना. दिपक केसरकर**
  मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. रनजीत सिंह देओल**
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
  **मा. सूरज मांढरे**
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र, पुणे.
- **मार्गदर्शन :**
  **श्री. अमोल येडगे** (भा.प्र.से.),
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **डॉ. महेश पालकर**
  संचालक, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
  **श्रीम. उषा शर्मा,** प्रोफेसर एवं प्रभारी,
  राष्ट्रीय साक्षरता केंद्र– कक्ष, एन.सी.ई.आर.टी., नवी दिल्ली.
  **श्री. रमाकांत काठमोरे,** सहसंचालक,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती व संपादन :**
  **डॉ. नेहा बेलसरे,** उपसंचालक, राज्य साक्षरता केंद्र,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
  **श्रीम. रत्नमाला खडके,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अकोला (महाराष्ट्र).
  **डॉ. मंजुषा क्षीरसागर,** प्रभारी प्राचार्य,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, धुळे (महाराष्ट्र)
- **समन्वयक :**
  **डॉ. गितांजली बोरुडे, विभाग प्रमुख,**
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे,
  **श्री. सचिन चव्हाण, विभाग प्रमुख,**
  सामाजिक शास्त्र विभाग , राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे,
  **श्री. पंढरीनाथ जाधव, अधिव्याख्याता,**
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
  **श्री. अण्णासाहेब कुटे, विषय सहाय्यक,**
  राज्य साक्षरता केंद्र, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे
- **तांत्रिक सहाय्य व डिझायनिंग :**
  **श्री. स्वप्निल वैरागडे**, शिक्षक, जि. प. प्राथ. शाळा महाबळा, ता. सेलू, जि. वर्धा.
- **मुखपृष्ठ रेखाटन :**
  **श्री. सुभाष जीवा राठोड**, कलाशिक्षक, दीपचंद चौधरी विद्यालय, सेलू, जि. वर्धा.
- **प्रथम आवृत्ती :** सप्टेंबर 2023
- **अर्थसाहाय्य :** राज्य साक्षरता अभियान प्राधिकरण, शिक्षण संचालनालय (योजना), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **मुद्रक :** रुना ग्राफिक्स, पुणे


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन.

# चला जाऊया गोष्टींच्या गावा!





राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या अनुषंगाने केंद्र शासन पुरस्कृत 'नवभारत साक्षरता कार्यक्रम' सन 2022-23 ते सन 2026-27 कालावधीत राबविला जात आहे, कारण 2011 च्या जनगणनेनुसार देशातील 15 वर्षे आणि त्यावरील वयोगटातील निरक्षराची संख्या 25.76 कोटी आहे; त्यात 9.08 कोटी पुरुष आणि १६.६८ कोटी महिला आहेत.

सन 2009-10 ते 2017-18 दरम्यान साक्षर भारत कार्यक्रमांतर्गत 7.64 कोटी एवढ्या साक्षर झालेल्या व्यक्तींच्या प्रगतीचा अहवाल विचारात घेतला, तर सध्या देशात सुमारे 18.12 कोटी लोक अजूनही निरक्षर आहेत.

देशातील जनता 100% साक्षर होण्यासाठी 'नवभारत साक्षरता कार्यक्रम' सुरू करण्यात आलेला आहे, ज्याची 'साक्षरतेकडून समृद्धीकडे' (From Literacy to Prosperity) आहे. हा कार्यक्रम जनचळवळीचा भाग होणे अपेक्षित आहे. नवसाक्षरांना शिकविण्यासाठी शाळांवर प्रमुख जबाबदारी सोपविण्यात आली आहे. शासकीय/अनुदानित/खाजगी शाळांमधील शिक्षकांसह, शिक्षक पदाचे शिक्षण घेणारे उच्च शिक्षण संस्थांमधील विद्यार्थी, पंचायतराज संस्था, अंगणवाडी सेविका, आशा कार्यकर्त्या तसेच NYKS, NSS यांचा देखील स्वयंसेवक म्हणून सहभाग आहे.

या स्वयंसेवकांकडून नवसाक्षर लाभार्थींचे शिक्षण पूर्ण होण्यासाठी, अध्ययन साहित्याची निर्मिती करण्यात आलेली आहे, ज्यामध्ये उजासचे एकूण चार मोड्यूल आहेत. या मोड्यूल्सचा उद्देश जीवन कौशल्ये विकसित करणे हा आहे. या कौशल्यांमध्ये आर्थिक साक्षरता, कायदेविषयक साक्षरता, डिजिटल साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व जागरूकता, बालसंगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण इ. बाबींचा समावेश आहे. या कौशल्यांचे आकलन वा समज विकसनासाठी अध्ययन पूरक साहित्य म्हणून गोष्टीच्या स्वरूपात 'चला जाऊ या गोष्टींच्या गावा' या पुस्तकाची निर्मिती केली आहे. यात नवसाक्षर लोकांच्या अनुभव विश्वातील उदाहरणे व भाषा यांचा उपयोग केला आहे.

प्रस्तुत पुस्तक कौशल्ये रुजविण्यासाठी आधार देईल असा विश्वास वाटतो.

**अमोल येडगे** (भा.प्र.से),
संचालक,
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| 1. | परिवार | 1 |
| 2. | संभाषण | 4 |
| 3. | कायद्याचे ज्ञान | 6 |
| 4. | खाण्यापिण्याची संस्कृती | 8 |
| 5. | मनोरंजन | 11 |
| 6. | वित्तीय साक्षरता | 13 |
| 7. | कायद्याची साक्षरता | 18 |
| 8. | जवळपासच्या बाबी | 21 |
| 9. | डिजिटल साक्षरता | 27 |
| 10. | नैसर्गिक आपत्ती | 29 |
| 11. | घड्याळ | 31 |
| 12. | यात्रा | 33 |
| 13. | मतदान | 36 |
| 14. | शेजारी | 38 |
| 15. | स्वातंत्र्य सेनानी | 40 |
| 16. | खेळ | 42 |
| 17. | दारूचे व्यसन/दारूबंदी उठाव | 45 |
| 18. | वित्तीय साक्षरता (बँक व्यवहार) | 47 |
| 19. | डिजिटल साक्षरता | 49 |
| 20. | हागणदारी मुक्ती (स्त्रियांनी केलेला उठाव) | 51 |

# 1. परिवार

## घर

पूर्णा नदीच्या काठावर आंबेवाडी नावाचे एक गाव होतं. या गावात भगवान, गोविंदा आणि महादू हे तिघे भाऊ एकत्र राहात होते. त्यांना एक बहीण होती. त्यांचे वडील लहानपणीच वारले होते. त्यांच्या आईने या मुलांना लहानाचे मोठे केले. तळहातावरच्या फोडासारखे जपले.



त्यांची पाच एकर जमीन होती. मोठा भगवान चौथीपर्यंत शिक्षण घेऊन शेती करू लागला. रात्रंदिवस तो शेतीत राबू लागला. काबाडकष्ट करू लागला. त्यामुळे या कुटुंबाला वर्षभर पुरेल इतके धान्य व्हायचे. शेतात गहू, कापूस, ज्वारी यांसारखी थोडी थोडी पिके घेतली जायची. सगळं कसं आनंदात चाललं होतं.

तिघाही भावांची लग्न झाली. धाकट्या बहिणीचे लग्न झाले. तिला शेजारच्या दरेगावला दिले होते. मोठ्या भगवानला दोन मुले होती. गोविंदाला एक मुलगी झाली होती. लहान्या महादूचे लग्न मागल्या सालीच झाले होते.

घर बाळगोपाळांनी भरलं होतं. नातवांची तोंडं पाहून आजी सुखी झाली होती. असं हे सुखी–समाधानी घर.

पण या भरल्या घराला अचानक ग्रहण लागलं.

घरात कुजबूज चालू होती. भगवानची बायको त्याला एकदा म्हणाली, ''माळीवाड्यातल्या नामदेव अन् त्याचा भाऊ वायले–वायले निघाले. असं मधली मला म्हणाली.''

''बर मंग?'' भगवाननं विचारलं.

अं! म्हणाली असंल, सहज माहिती झालं त. तू काहून डोक्यात राख घालून घेती?''

तसं नाही व पण....'' तिचं बोलणं मध्येच थांबवत तो तिला म्हणाला, '' तुह्या बी वायलं निघायचं हाये का राधे ?''

''नाही हो, मधली तसं म्हणाली म्हणून हे सगळं तुमच्या कानावर घातलं?''

'' मधली काय म्हणाली आणखीन? '' त्यानं विचारलं.

''तुम्ही घरात मोठे. धंदा कारभार तुम्हीच पाहता. ते मधल्याला सहन होत नाही.'' राधानं आगीत तेल ओतलं.

''तसं आसल तव्हा म्हणावं व्हा वायले, मह काय जातं'', भगवान बोलला.

दोघा नवरा – बायकोचं बोलण चालू होतं. हे सगळ बोलणं महादूच्या बायकोनं, कांतानं दाराआडून ऐकले.

रात्री कांताने हा विषय नवऱ्याजवळ काढला. तिने नवऱ्याचे कान भरले. तोही भडकला. घरातल्या वेगळं निघायच्या गोष्टी आईच्या कानावार गेल्या. हे ऐकून ती खिन्न झाली. नाराज झाली.

नवरा गेल्यावर मोठ्या कष्टाने तिनं घराला घरपण दिलं होतं. गावात घराची इज्जत वाढवली होती, पण घरात वेगळ निघायचं विष कोणी कालवलं हे तिला कळत नव्हतं.

घरातलं वातावरण बिघडत चाललं होतं. तिघंही भाऊ आपसात तुटक बोलत होते. जावा–जावाही एवढ्या तेवढ्यावरून एकमेकींना टाकून बोलत होत्या. दुधात मिठाचा खडा पडावा तसं घराचं झालं होतं.

रात्री सर्वांची जेवण झाल्यावर आईने तिघाही मुलांना बोलावलं.

ती म्हणाली, ''घरात काय ही धुसफूस चालली बाप्पा? खस्ता खाऊन म्या वावर–शिवार वाढवलं. दैना भोगली, पण तुम्हांला काही कमी पडू दिलं नाही. घराची एकमूठ असली, तर समाजात मान राहतो. गावात आब राहते. मग ह्या वायल निघायच्या गोष्टी काहून करता?

''आवं मा, समद्यांची इच्छा आहे, वायले निघायची'' गोविंदा आईला म्हणाला.

''आवं मा, हे दोघे वायले झाले, की मी आपसूकच वायला पडतो नं.'' गोविंदा सावधपणे बोलला. यावर तिघाही भावांचा वाद वाढत चालला होता. हे पाहून आईच्या डोळ्यात पाणी आलं. दरेगावच्या आपल्या लेकीला, सुमनला आईने निरोप धाडला. भाऊ वेगळं निघणार याची चर्चा तिच्या कानावर गेली होती. सुमन नवऱ्याला सांगून धावत–पळत आंबेवाडीला आली.

सुमनला दारात पाहताच आईला रडू कोसळलं. ''भावाह्यल तू समजून सांग मायबाई'' असं म्हणून आईन हंबरडा फोडला. ''वावर–शिवार वाटू नका. घराच्या एका दरोज्याचे तीन दरोजे करू नका म्हणावं माय''.

बाहेरचा रडण्याचा आवाज ऐकून मोठी भावजय समोर आली. तिला पाहून सुमन म्हणाली, ''तू तर मोठी हायेस वयनी. त्वा सगळ्यांना समजून घ्यायचं. दादानं समजून घ्यायचं ते दिलं सोडून. आन वायलं निघायचं काय पिल्लू सोडलं तू घरात?

''आवं सर्वाहिलेचे वाट्तं तस. तुम्ही म्हाह्याच डोक्यावर काहून खापर फोडता माय?'' राधा म्हणाली.

सुमनने भावांना, भावजयांना लाख समजावलं, पण सगळेच एकमेकांचा दोष दाखवत होते. सुमनचा नाईलाज झाला.

समजावून काही फायदा नाही. तू वाईट वाटून घेऊ नको, असं सुमननं आईला सांगितलं. सुमन आली तशी दारेगावला निघून गेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी रामभाऊ सोनकरला तिघा भावांनी बोलावून आणलं. रामभाऊ घरी येताच आईन ओळखलं. रामभाऊ काहयले आला म्हणून. गावात रामभाऊशिवाय दुसरा कोणी जमीन मोजणारा नव्हता.

आईच्या छातीत अचानक कळ आली. तिचा जीव घाबराघुबरा झाला. तोंडाला कोरड पडली. जीव पाणी पाणी करू लागला. म्हातारी खाली कोसळली. रामभाऊ लगीच म्हातारीकडे धावला. ''वावराच्या वाटण्या करू नका बाबा.'' असं तिनं रामभाऊला सांगितलं.

डॉक्टरला बोलवा, असं रामभाऊ जोरात म्हणाला. गर्दी खूप झाली.

मधला मुलगा गोविंदा गर्दीतून वाट काढत पुढे आला. महादूही धावत पळत आला, पण सारं संपल होतं. आईच्या शरीरातून प्राण पाखरू केव्हाच उडालं होतं.

दोघा भावांनी टाहो फोडला. तेवढ्यात मोठा भगवानही आला.

त्याला पाहताच लहाना महादू मोठ्याच्या गळ्यात पडला. तिघाही भावांना दु:खाचा पहाड कोसळ्यासारखं झालं होतं.

गोविंदा मोठ्याला म्हणाला, ''दादा वावराच्या वाटण्या होऊ नायी असं मायला वाटत होतं. वावर तिला माय वाटत होती.''

''वाटणीच्या भानगडी पायी आपून माय गमावली रे, आता तू मोठा. तूच आम्हांला सांभाळ. आपलं वावर आपली माय हाय. त्या काळ्या मायेच्या वाटण्या नाही रे करायच्या. निदान मायच्या आत्म्याला तरी आपण शांती देऊ शकू रे ''

मोठ्याने दोघा भावांना जवळ घेतलं. तिघांना रडू आवरत नव्हतं.

■ ■ ■

# 2. संभाषण

## मुलगी नको, सून हवी.

सीमा : अहो ऐकलं का?

रमेश : अगं, मी बहिरा नाही. सतत तुझंच तर ऐकत असतो. मी तुला काही ऐकवतो का? ऐकव.

सीमा : बस, पुरे. काय ऐकलं हो तुम्ही? आता आपल्या एकुलत्या एक समीरच लग्न.....

रमेश : कधी करणार? हेच ना!

सीमा : हो, मग दुसरं काय?

रमेश : समीरच लग्न व्हावं, घरात सून यावी, सुनेच्या हातचा गरम गरम चहा प्यावा, असं मलाही वाटतं.

सीमा : मग, त्यासाठी काही हालचाल करायला नको का?

रमेश : करायची ती हालचाल मी केली आहे, पैसे जमवले आहेत. चांगलं मंगल कार्यालय हेरून ठेवलं आहे, पण समीरचं लग्न करायला मुलगी नको का?

सीमा : पाच वर्षे झाली. मुलगी शोधताहेत. एक मुलगी तुम्हांला सापडत नाही. डझनवारी मित्र तुमचे. त्यांना कोणालाच मुलगी नाही का हो?

रमेश : अगं आहेत ना. फार नाहीत, पण थोड्याफार आहेत.

सीमा : मग अडतंय कुठे? पाटील साहेबांच्या मुलीचं नक्की झालं होतं, त्याच काय झालं?

रमेश : पाटीलसाहेब समीरला मुलगी द्यायला तयार आहेत.

सीमा : वा वा वा ! मग अडलं कुठ? नक्की करा अन् लग्नाचा बार उडवून टाका. नाही तरी सोनाली समीरची मैत्रीणच आहे ना!



रमेश : घोडं इथंच पेंड खातंय. समीर गुटखा खातो. सोनाली म्हणाली, ''समीर माझा मित्र आहे. पण नवरा म्हणून नको.''

सीमा : कमाल आहे सोनालीची. गुटखा खातो म्हणून नकार. आता तुम्ही तंबाखू खात होता. मला माहीत होतं, पण मी कुठं दिला नकार.

रमेश : अगं, तुझ्या बापाला चार मुली होत्या. मुलींना उजवावं कसं या चिंतेत ते होते. तुलाही लग्नाची चिंता होती.

सीमा : खरं आहे बाई! मुलींचा विचार कोणीच घेत नव्हतं. आता मुलींची संख्या घटली अन् मुली धीट झाल्यात.

रमेश : अगं चांगल्याच धीट झाल्यात. आता समीरसाठी डझनाने मुली पाहिल्या मी. कुणाला बंगला हवा तर कुणाला गाडी. कुठे सासू-सासरे आहेत म्हणून नकार.

सीमा : मुलीला उजवण्यासाठी वधूपित्याला जोडे झिजवावे लागत. आता तीच पाळी वरपित्यावर आली.

रमेश : मुला-मुलींचं लग्न आनंदाने होतं, तो निरोगी समाज. छळ-छळवणुकीमुळे मुलगी नको ही भावना बळावली.

सीमा : खरं आहे रमेश. आपणही गुन्हेगार आहोत. आपण ही गर्भजल परीक्षा केली. आपल्या मुलीची हत्या केली. एकच मूल हवं आणि तो मुलगाच हवा. खरं तर आपण चूकच केली. मुलगा-मुलगी हा भेदाभेद आपणही केला.

रमेश : खरं आहे सीमा. ही चूक अनेकांनी केली. मुलगी नको सून मात्र हवी. सून येईल कुठून? हा दूरचा विचार केला नाही. मुलींची संख्या घटली. आता अनेकांना बायको मिळणार नाही.




(समीर, सोनाली दोघे येतात. रमेश-सीमाच्या पायाला हात लावून उभे राहतात. दोघेही आश्चर्याने पाहू लागतात.)

सोनल : आई, बाबा आमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे. आम्ही लग्न केलं आहे, पण ते नोंदणी पद्धतीनं. लग्नाचा खर्च वाचला आहे. मी गुटखा खाणार नाही, असं वचन दिलंय.

व्यसने आरोग्यास घातक असतात, हे आता आम्हांला कळलं आहे.

# 3. कायद्याचे ज्ञान

## हुंडा बंदी कायदा

### [ भारतीय दंड संहिता कलम 498 (अ) ]

बऱ्याच दिवसांपासून पिंपळगावला जायचे म्हणत होते, परंतु कोर्टातील कामामुळे वेळच मिळत नव्हता. माझी ताई रागावलेली असेल याची खात्री होती, तरीपण पिंपळगावला जायचे मी ठरवले. मनात भीती होतीच, कारण बहिणीच्या मुलाच्या लग्नात मी हजर नव्हते. आता ताई रागावून स्वागत करणार असं मी गृहीत धरलं होतं आणि तसंच घडलंही.

माझा पाय दारात पडताच ताई ओरडतच बाहेर आली, ''या वकिलीणबाई, आताशी वेळ मिळाला होय?'' माझ्या मेव्हण्यांना मात्र राहावलं नाही. ते घाईने बाहेर येऊन ताईला म्हणाले, ''अगं तिला अगोदर घरात तर येऊ दे. मग तिला काय बोलायचे ते बोल.'' ताई जरा शांत झाली. मी आत आले. ताईचं घर मला आधीपेक्षाही खूप छान, सुबक, नीटनेटकं वाटलं. मी तस ताईला म्हटलेही, परंतु तिने लगेच नाक, डोळे मुरडले आणि हे माझ्या नजरेतून सुटले नाही.

आत गेल्यावर थोडावेळ आराम केला. ताईने परत सुरवात केली, ''लग्नाला का नाही आलीस?'' त्यावर तिला मी म्हटले. आता आले आहेच नं तुझ्या सुनेला पाहायला. दाखव ना ! सुनमुख तर पाहू दे की जरा. तिला काय कुठे दडवून बिडवून ठेवले आहेस की काय?''

तेवढ्यात ताईने सुमनला म्हणजे तिच्या नवीन सुनेला आवाज दिला. '' सुमे, जरा बाहेर ये.'' सुमन घाईघाईने बाहेर आली. डोक्यावर एवढा मोठा घुंगट घेऊन माझ्या समोर उभी राहिली. मला आणि ताईला म्हणजे तिच्या सासूला नमस्कार केला. एका बाजूला कोपऱ्यात उभी राहिली.

पाहताच क्षणी मला सुमन नाराज आणि थोडी दबलेली, बावरलेली वाटली. ताईने तेवढ्यात आवाज चढवला आणि तिला म्हणाली ''अगं टवळे, जा की जरा घरात आणि घरातली कामं कर, उभी काय इथे शुंभासारखी.'' हे शब्द ऐकून मला आश्चर्य वाटलं. सुमन घाईने आत गेली.




संध्याकाळी ताईचा मुलगा श्रीकांत घरी आला. त्याने माझी

चौकशी केली आणि आत निघून गेला. ५ मिनिटांनी बाहेर आला व काही न बोलता निघून गेला. एकंदरीत मला घरातील वातावरण थोडंसं खटकलंच. मग रात्रीची जेवणं आटोपल्यावर मी ताईला विचारलंच, ''काय गं, तुझी सून जास्त काही बोलतच नाही. अशी घाबरलेली का दिसली ती मला.''

त्यावर ताईने सुरुवातच केली, ''तिला काय धाड भरलीय. खाऊन चांगली म्हशीसारखी झालीय ती.

उलट आम्हांलाच आता नकोसं झालंय जगणं. लग्नात हुंडा ठरवला होता, तो दिलाच नाही. शिवाय मानापानाच तर काही विचारूच नको. आता श्रीकांतला नोकरीवर कायम करायचं, तर त्यासाठी दीड लाखाची गरज आहे. ते जरा तिच्या बापाला मागतोय तर काय गुन्हा करतोय का?

चला, एकूणच प्रकार काय चाललाय हे माझ्या लक्षात आलं. मग मी जरा ताईला गप्पाच्या ओघात समजवायला सुरुवात केली. मी म्हणाले, '' भारतीय दंड संहिता कलम 498 (अ). या कलमानुसार आपण आपल्या सुनेकडे कुठल्याही प्रकारची मागणी करू शकत नाही, म्हणजे हुंड्याची मागणी, दागदागिन्यांची किंवा कुठल्याही वस्तूची मागणी. आपण लग्नात किंवा लग्नानंतर सुनेला हुंड्यासाठी शारीरिक किंवा मानसिक त्रास देऊ शकत नाही. दिला, तर त्यासाठी या कलमानुसार 3 वर्षे शिक्षा तसेच दंड किंवा दोन्ही होऊ शकते. शिवाय हा गुन्हा नॉन बेलेबल म्हणजेच अजामीनपात्र असा आहे.



पोलिसात जर तक्रार दाखल केली तर लगेच घरातील सर्व सदस्यांना अटक होईल. त्यांचा जामीनही होणार नाही. एवढे सांगितल्यावर ताईच्या चेहऱ्यावर मला थोडी भीती दिसली, तसा मला चेव आला.

मी तिला म्हटले, '' कशाला गं हवेत आपल्याला दुसऱ्यांचे पैसे किंवा दागदागिने. देवकृपेने आपल्याला सगळं काही मिळालेलं आहे. सोन्यासारखा मुलगा आहे. एवढी चांगली सून मिळाली आहे. तिला आणखी पुढे शिकव. तीच स्वतः काही तरी नोकरी व्यवसाय करेल आणि घरात समृद्धी आणेल.

शेवटी मी तिला सांगितलं. इंग्रजीत सुनेला म्हटलं आहे डॉटर इन लॉ; म्हणजेच सून कायद्याने आपली मुलगी आहे. तिला आपण आपली मुलगीच मानायला हवे.''

एवढे सांगितल्यावर, ताईचे डोळे खाडकन उघडले. मला म्हणाली, ''बरं झालं वकिलीणबाई तू सांगितले नाहीतर काही तरी वेगळंच होऊन बसलं असतं.'' नंतर आम्ही सगळे झोपायला निघून गेलो.

दुसऱ्या दिवशी सकाळी मी जायला निघाले. तेव्हा माझ्या ताईची तिच्या सुनेशी वागणूक एकदम बदललेली आढळली. ते पाहून मी सुस्कारा सोडला व जळगावला जायला निघाले.

# 4. खाण्यापिण्याची संस्कृती

## बाळाचा आहार

सावित्रीच्या लग्नाला दोन वर्षे झाली. पाळणा हालला नाही, म्हणून कुजबुज सुरू झाली. पाण्या–धुण्याला गेलं, की आयबाया टोकू लागल्या. तिच्या डोळ्यात पाणी येई. शेवटी अंगणवाडीच्या कुसुमशी ती बोलली. कुसुम म्हणाली, ''डॉक्टर बाईंकडून तपासणी करून घे''.

डॉक्टरबाईंनी सावित्रीला तपासलं. तिच्यात काही दोष आढळला नाही. मग त्या म्हणाल्या,''तुझ्या नवऱ्याला तपासावं लागेल.'' सावित्री म्हणाली, ''म्हणजे मांजराच्या गळ्यात घंटा बांधल्यावाणी झालं की! डॉक्टरबाई म्हणाल्या ''काही पण युक्ती कर आणि त्यांना घेऊन ये''

कुसुमने युक्ती सुचवली. सावित्रीनेही तसेच केले. नवसाचे नाटक करून ती नवऱ्याला शहरात घेऊन आली. मग गोड बोलून डॉक्टरकडे घेऊन गेली. सावित्रीच्या नवऱ्याला मित्र चिडवायचे, ''मर्द न्हाईस की काय?'' तोही त्यामुळे जरा नाराज असायचा.

तपासणीत समजले की, सावित्रीच्या नवऱ्यालाच औषधाची गरज आहे. तो औषध नेमाने घेऊ लागला. आणखी एक वर्ष तसंच गेलं. काळजी वाटत होती. एक दिवस कळलं सावित्रीला दिवस गेले. सासूने लाड केले. मायन ओटी भरली. डोहाळे जेवण झाले. पुढे गोड मुलगी झाली.

सावित्री बाळाची काळजी कशी घ्यायची ते ऐकून, वाचून होती. लगेच पाजायलाही घेतलं. काळंभोर जावळाच्या बाळाने, तेला पाण्यानं छान बाळंस धरलं. पोरीचे डोळे छान म्हणून नाव ठेवलं कमला! अंगावर पीत होती. छान खेळत होती. मान धरायला लागली, अन् अचानक नजर लागल्यावाणी हळूहळू सुकू लागली.

सावित्री आता शेतात कामाला जायला लागली होती. बाळंतीण म्हणून किती दिवस लाड होणार? धुणं–पाणी, स्वयंपाक सगळंच मागे लागलं. पोरगी किरकिर करायची. कुणी म्हणे 'दृष्ट काढ' कुणी म्हणे 'संध्याकाळी पिपळा खालनं गेली.' एक ना दोन, सावित्री कावरीबावरी झाली. पुन्हा कुसुमकडे गेली.

कुसुमन वजन केलं आणि चकितच झाली. पोरीचे वजनच वाढले नव्हते. कुसुमने विचारले, ''अंगावर पाजतेस की बाटलीने दूध देतेस?''

सावित्री म्हणाली, ''आता पाच महिने होत आहेत. अंगावर जास्त दूध येत न्हाई. मग रडली तर पाजते वरचं.'' कुसुमनं पुन्हा विचारलं, ''पण दूधाशिवाय वरचा आहार देतेस की नाही?''

सावित्री म्हणाली, ''आन हे काय नवीनच! हा कसला पूरक आहार?''

कुसुम म्हणाली, ''वा ग वा ! किती समजावून सांगते, तरीही विसरून जाता; आणि हे काय नवीन म्हणतेस?''

''दूध हे बाळासाठी पोषक आहे, हे खरंच, पण त्यातही काही घटक कमी असतात. म्हणजे लोह, क जीवनसत्व, प्रथिन.''

सावित्री म्हणाली, ''हे आधीपासूनच का नाही घ्यायचं?''

कुसुम हसली. तिने समजावून सांगितलं, ''गर्भाशयात आईकडून जे पोषण होतं, त्यात लोहाचा साठा असतो, पण जसंजसं मूल वाढत जातं तशी त्याची गरजपण वाढते, शरीरात आणखी रक्त तयार होतं; म्हणजे आणखी लोह, इतर जीवनसत्व, प्रथिने लागतात.

सावित्रीने विचारलं, ''ते द्यायचे कसे? अजून तर दात पण नाहीत तिला''

कुसुम म्हणाली, ''म्हणून तर पातळ रूपातच द्यायचं. डाळ शिजवतो, भात शिजवतो, त्याच्यावरचं पाणी, टमाट्याचे, पालकाचे पाणी चमचा चमचा सुरू कर. त्यालाच पूरक आहार म्हणतात.''

सावित्री म्हणाली, ''पण सासूबाई ऐकतील का? काय नवी थेरं म्हणून राग धरतील.''

कुसुम बोलली, ''अगं म्हणूनच त्यांची दोन मुलं कुपोषित झाली. नंतर मरणही पावली बिचारी. तू तरी नीट ऐक. पिकलेली केळी चांगली कुस्करून दे. शिजलेल्या भाज्या पुरणयंत्रातून काढ. त्या दे. एक चमचा रवा हलका भाज आणि दुधात चांगला शिजव. साखर घाल, तो दे. अगं तिसरा महिना संपला, की हे करायला लागायचे.''

तरीही सावित्रीला शंका आलीच. ''बाळाला पचेल का? हगवण लागेल का?''



कुसुमनं सांगितलं, ''चमचा चमचा सुरू करायचे. पचायला लागलं की, मात्र वाढवायची. मोसंबीचा रस, पपईचा गर, चिक्कू, मिळतील ती फळं द्यावी. ७–८ महिन्यापर्यंत एकवेळच्या दुधाऐवजी सत्तूचं पीठ, नाचणीची लापशी. कधी ताकात तर कधी दुधात द्यावी.''

''मटणाचे, कोंबडीचे पाणी दिले तर?'' सावित्रीने विचारलं.

कुसुम म्हणाली, ''जरूर दे. खूप ताकद येईल. रोग पळून जातील. आधी अंड्याचं पिवळं शिजवून द्यावे. मग पांढरे पण.''

''समदे हातात बिस्कुट देतात. अन् मग चिकट परसाकड होते तिला,'' सावित्री म्हणाली.

''उघड्यावरचे मैद्याचे, सारखे गोड देऊ नको. आता समजावलं तसं १५ दिवस करून बघ आणि मग वजन करायचं. हे बघ कार्डच देते तुला. त्यावर लसीचं वेळापत्रक आणि वजनाचा तक्ता पण आहे बघ. काम कर, पण पोरीकडे लक्ष दे आणि स्वतःकडे पण लक्ष दे. बाळाला देतेस ते वाटीभर तू पण खा. हळूहळू अंगावरचं दूध कमीच होणार. गाईचं दूध वाटी चमच्याने पाजायचे.''

सावित्री म्हणाली, ''ते बारीक लक्षात आहे बरं का. दूधाची बाटली म्हणजे बाळाचा शत्रू. हगवण होते, हो नं?''

बाळ बसायला लागलं, की गाजराचे तुकडे द्यायचे. काकडीचे तुकडे द्यायचे. डाळ–तांदूळ धुऊन खिचडी शिजवून भरवायची. आपण पण खायचं. एखाद्या बाळाला दात येताना त्रास होतो. कधी कधी पातळ परसाकड होते, म्हणून जेवण देणं थांबवायचं नाही.

सावित्री म्हणाली, ''कुसुमताई, तू माझी धर्माची बहीण. चांगली माहिती दिलीस. तुमचे हे उपकार ..........?''

कुसुमने चिडवलं, ''कसले ग उपकार?'' दोघीही हसायला लागल्या.

# 5. मनोरंजन

## देहनगरीचा संप

देहनगरीची सभा भरली. विषयांमागून विषय निघाले. हातोजींनी सूचना मांडली, ''आपल्या नगरीत आळशी कोण, याची चौकशी करावी. पायोजींनी मन डोलावली.'' ''करा चौकशी,'' सगळे ओरडले. कमिटी तयार झाली. डोळोबा अध्यक्ष झाले. दिवसांमागून दिवस गेले. कमिटीचा अहवाल आला. काय अहवाल आला?

पोटोबा दोषी ठरले. पोटोबा आळशी ठरले.

''बरोबर... बरोबर '' सगळे ओरडले.

हातोजी म्हणाले, ''मी काम करतो. अन्न मिळवतो. तोंडापर्यंत पाठवतो.''

पायोजी म्हणाले, ''मीच तुला ठिकठिकाणी नेतो.''

दातांनी खणखणाट केला, ''मी चावतो, घास मऊ करतो.''

''इशश....... मी गिळते याच कोणाला भानच नाही,'' जीभबाई ठसक्यात बोलल्या.

''बरोबर... बरोबर... आम्ही सगळे काम करतो, पोटोबाला पोसतो. आता हे करायचं नाही.

पोटोबाला पोसायचं नाही. आम्ही संप करणार. काम बंद ठेवणार.'' सगळे ओरडले.



डोकोपंत म्हणाले, ''तुमचा संप टिकायचा नाही.''

''संप कोणी मोडायचा नाही,'' सगळे ओरडले.

संप सुरू झाला. हात, पाय थंड बसले. दातांनी कवळी मिटली. जीभबाईने दडी मारली. दिवसांमागून दिवस गेले. जीभबाई सुकून गेली.

सगळ्यांची घाबरगुंडी उडाली. सगळे धावले डोकोपंतांकडे.

डोकोपंत हसले. ते म्हणाले, ''वेड्यांनो, पोटोबा आळशी नाहीत. त्यांचं काम दिसत नाही, पण ते थांबले, तर तुम्हांला ताकद मिळणार नाही.''

पोटोबांचे मोठेपण सर्वांना उमगले. संप मिटला.

परत देहनगरीत आनंद पसरला.

# 6. वित्तीय साक्षरता

**स्वयंरोजगार**

आज मी खूप आनंदात होते. कधी एकदा दुपार होते याची वाट पाहत होते. मी खूप दिवसानंतर माझ्या गावाकडे जात होते.

एस. टी. भरधाव होती. एप्रिल महिना होता. ऊन खूप तापलं होतं. झळा जाणवत होत्या, परंतु तरीही मन प्रसन्न होते. गावाकडची ओढ लागली होती ना!

सर्व काही डोळ्यांसमोर तरळत होतं. 'तो गावातला चिरेबंदी वाडा. गेल्याबरोबर अंगण. अंगणात रांगोळी. बसलेले आजोबा. माजघरात आई, काकू, वहिनी काय बरं करत असतील?' असा विचार पण मनात येत होता.

तंद्री लागली होती. तेवढ्यातच कंडक्टरने घंटी ओढली, तशी एसटीतून उतरले.

समोर दोन तीन चहाच्या टपऱ्या होत्या. पानाची दुकाने होती.

माझी नजर रामूकाकाला शोधत होती. तेवढ्यात रामूकाका हजर! ''चला ताईसाहेब, गाडी तयार आहे.'' मी म्हणाले, ''गाडी?''

''अवं गाडी म्हणजे आमची बैलगाडी, तुमची मोटारगाडी नव्हे !''

खूप दिवसांनी मी बैलगाडीत बसले. खिल्लारी जोडी पळत होती.

गाडी वाड्यासमोर येऊन उभी राहिली, रामूने आवाज दिला, ''मालक, ताईसाहेब आल्या.''

आजोबा काठी टेकीत आले. मी खाली वाकून नमस्कार केला.

''पोरी शहरात राहून विसरली नाहीस बरं आपल्या घरची रीत'', आजोबा म्हणाले.

घंगाळातलं पाणी घेऊन हात-पाय धुतले. घरात शिरले तर काय आजी, आई, काकू तिघीही उभ्या. चेहरा आनंदी, पण डोळ्यात अश्रू! ते पाहून मन गहिवरून आलं. एकमेकींना कडकडून भेटलो.

''काय गं मंदाताई, फार दिवसांनी आमची आठवण झाली तुला. आम्ही मात्र रस्त्याकडे डोळे लावून बसतो. आज येईल, उद्या येईल.''

''अगं आई, मुलींच्या परीक्षा होत्या. परीक्षा संपल्या तशी लगेच मी निघाले.''

''बरं झालं बाई. तुझ्या पोरी शिकत आहेत. तुझ्या बहिणींचं बघ, नववी पास झाल्या. गावात शाळा नाही. त्यांचं शिक्षण सुटलं.''

''आता काय उद्योग करतात?''

''काय करणार? घरीच असतात. घरचीच काम करतात.''

''आई, सरला, शारदा आहेत कुठे पण?''

''अगं परसात असतील. उन्हाळ्याची कामं करताहेत. घरचं तरी शिकावं की! उद्या लग्न झाल्यावर सासरची माणसं काय म्हणतील, पोरीला काही पण शिकवलं नाही बघा.''

''त्या काय काम करतात?''

''परसात जा, म्हणजे दिसेलच तुला. एका मिनिटांची फुरसत नाही. वर्षभरासाठी जिन्नस तयार करावे लागतात; म्हणजे तूच बघ, त्यात एखादीचं लग्न ठरलं तर रुखवत पण नको का? वळवट, शेवया, बोटवे.

यंदा आंबा पण छान फुटला. मग रसावळीला काही कमी का गं. कुरडया - पापड्या पण लागणारच ना? सांडगे, खारवड्या हव्यात. काय सांगू तुला, तूच राहा आठ दिवस आणि बघ. तू कसची राहतेस म्हणा. दोन-तीन दिवस राहशील आणि पळशील मुंबईला.''

''आई मी चांगले दहा दिवस राहणार आहे. यावेळी ठरवूनच आले.''

''काय बाई? काय विशेष हाय का?''

''तसं नव्हे गं, सहजच राहायचं ठरवलं.''

''मंदाताई, तू मुलींच्या कॉलेजात मास्तरीण आहेस नव्हं. नवीन नवीन करायला शिकवती म्हण. तुझ्या बहिणीला शिकव की काही.

काय करावं, तुझ्यासारख्या शिकल्या नाहीत बघ त्या. आता तारांबळीचं जिणं बघ. तुझं बरं बाई तू नोकरी करतेस, पैसा कमावतेस. आमच्या सारखं एक-एक रुपयासाठी हात नाही पसरावा लागत तुला. आमचा काळ वेगळा होता. पण ह्यांचं कस व्हायचं गं? काळजीच वाटून राहिली बघ. खेडेगावात काही शिक्षणाची पण सोय नाही.

''अगं आई, काळजी करू नकोस. मी आहे ना. काहीतरी मार्ग निघेलच की. मी आता चांगली दहा दिवस राहणार आहे. गप्पांच्या नादात त्या दोघींना भेटायचे विसरलेच की! चल नं आई परसात.''

आम्ही परसात गेलो. तेथे बाज टाकली होती. बाजेवर पांढरे धोतर अंथरले होते. दोघी कुरडया उलटण्यात मग्न होत्या. त्यांना कसलं भान! दुसऱ्या बाजूला पापड घातले होते.

मी हळूच मागून जाऊन डोळे झाकले. ''ओळख कोण आहे?''

लगेच त्या म्हणाल्या, ''मंदा अक्का!

''बरं ओळखलं गं तू!''

''अगं अक्का, तुझा आवाज कसा विसरणार?''

''अरे व्वा, खूपच छान कुरडया घातल्या की. पापड पण झकास आहेत.''

''कोणी केले?''

''आईने पीठ शिजवून दिले. आम्ही दोघींनी कुरडया घातल्या.''

तेवढ्यात आईचा आवाज आला, ''अग पोरींनो, अक्काला चहा पिऊ देता का? आत या बरं.''


खूप दिवसांनी आईच्या हातचा चहा मिळाला, तो पण घरच्या दुधाचा. नाहीतर मुंबईत नेहमी डेअरीचं दूध.

''अगं आई, तुम्ही कुरडया, पापड, वळवट, ज्वारी–तांदुळाच्या पापड्या, शेवया, दही मिरची, खारवड्या, बाजरीच्या पापड्या करता ना! हे सगळे पदार्थ मुंबईतल्या लोकांना पण खायला आवडतात बरं का? परंतु तिथे करणार कोण?

बायका नोकरीला जातात. वेळच नाही त्यांना. त्यात दहा दहा मजली उंच इमारतीत राहतात. वाळवायला पण जागा नाही. कित्येक जणींना तर हे पदार्थ कसे करायचे हेच माहीत नाही, परंतु खायला मात्र आवडतात. मग काय करतात माहीत आहे? हे सर्व पदार्थ विकत आणतात.''

''काय म्हणतेस मंदा? अगं बाई, बाजारातून का या जिनसा आणतात ? किती विकत आनावं आणि किती खावं बरं?''

''अगं आई, उपवासाचे पदार्थ म्हणजेच बटाट्याचे पापड, साबुदाण्याचे पापड, कुरडई, साबुदाण्याच्या चकल्या, भगरीच्या चकल्या, बटाट्याचे चिप्स हे पदार्थ सुद्धा विकत आणतात.''



''ए मंदा, किती गं नाव सांगशील आम्हाला? एवढे प्रकार माहीत नाहीत बाई. एवढं खाल्ल्यावर कसला गं उपवास? तुला येतात का गं हे पदार्थ करायला?''

''हो येतात की, माझ्या कॉलेजमधल्या मुलींना हे पदार्थ शिकवते ना!''


''तुझ्या बहिणींनाही शिकव बाई.'' ''हो, सरला, शारदा चांगल्या नववी पास आहेत. त्यांनी पुढाकार घेतला, तर गावातील महिलांसाठी काही उद्योग सुरू करता येईल की. उद्या दुपारी गावातील बायकांना वाड्यावर बोलवा. येथे महिलांची एक सहकारी संस्था स्थापन करता येईल. त्यांचा बचत गट स्थापन करू.''

उद्याचा विचार करता करता कधी झोप लागली समजलेच नाही.

दुपारी वाड्यावर बायका जमल्या. त्यात माझ्या जुन्या मैत्रिणी होत्या. काकू, आत्या सर्वांनाच मी खूप दिवसांनी भेटत होते. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या.

''मी तुम्हांला आज खास कामासाठी बोलावलं आहे. तुम्ही महिलांनी एकत्र येऊन गावात काहीतरी उद्योग सुरू करावा, असे मला वाटते. त्यामुळे सर्वांना काम मिळेल अन् पैसा पण मिळेल.''

''तुमच्या पोरी-सुना यांना वाचायला येतं की. त्यांना काहीतरी उद्योग लावायला नको का? मी जो उद्योग सांगणार आहे ना त्यात तुम्हांला तांत्रिक शिक्षण आहे. सध्या उन्हाळ्यातील कामे चालू असतील ना?''



''हो की गं! आता यायला पण वेळ नव्हता, परंतु वाटलं मंदाताई आली. बोलावणं आलं. जावं थोडावेळ वाड्यावर. काय शांतामामी आज काय काम काढलं?''

''अगं, कुरडया घातल्या, पापड पण केले. तुम्ही जे पदार्थ केले ना ते मोठ्या प्रमाणावर करा. शहरात या पदार्थांना चांगली मागणी आहे बघा. तिथे सर्व लोक हे पदार्थ विकतच घेतात.

तुम्ही सगळ्याजणी एकत्र या. एक सहकारी संस्था स्थापन करा. त्या संस्थेची नोंदणी करा. उद्योग गावातच सुरू करता येईल.

आपल्या लेकीसुना थोडा पैसा कमावू शकतील.''

''तुमच्या शहरी लोकांना आमचे खाद्यपदार्थ पसंत पडतील?''

''पडतील की. त्यात थोडी सुधारणा करावी लागेल. सांगायचं म्हणजे कुरडई पांढरी शुभ्र दिसली पाहिजे. पापडाचा आकार पण गोल, सारखाच पाहिजे.

त्यात असलेल्या अन्नपदार्थाचे प्रमाण ठरवावे लागेल. स्वच्छता पाळली पाहिजे. चांगली पॅकिंग केले पाहिजे.

हे उद्योगातले सर्व बारकावे हळूहळू तुम्हांला पण शिकता येतील. फक्त तुमची इच्छा पाहिजे एकत्र येण्याची, तीन–चार तस काम करण्याची. जास्त भांडवलाची पण गरज लागत नाही.

काही उपवासाचे पदार्थ आहेत. साबुदाण्याची कुरडई, बटाट्याचे चिप्स, साबुदाण्याच्या पापड्या पण करता येतील. तुम्हांला हे सर्व करायला येतंच. त्यात थोडीशी सुधारणा केली की बस्स.

''सुरुवात कुरडई व पापडापासून करू या. हळूहळू उद्योग वाढवता येईल.''

''काय शांतामावशी पटतं का? मी काय सांगते ते? सरला, शारदा आणि तुमची सुनबाई पुढाकार घेऊन करू शकतात. मी सध्या इथेच आहे. तेव्हा दररोज दोन–तीन तास माहिती सांगेन,''

''तुमच्या हातची कमाई, बघा कसा आनंद वाटतो ते. आज एवढं पुरे झालं.''

शांतामामी म्हणाल्या, ''मंदा, बरं झालं बाई, तू आलीस नि आमचे डोळे उघडले बघ. हे उद्योग आम्ही नक्की सुरू करू.''

''हो तर मग.''

सर्व बायका एक नवीन दिशा घेऊन घराकडे परतल्या.

■ ■ ■

# 7. कायद्याची साक्षरता

## लोक अदालत

दिवस जरासा वर आला होता. गावातली माणसं आपापल्या कामात होती. तुकारामही लगबगीन कामाला निघाला होता. पांडुरंगनं हटकलंच त्याला.

''तुका, आरं ए तुका ऽ ऽ, कुटं निघालास इतक्या घाईत?''

''अर रं ऽ ऽ ऽ , काय पांडबा, हटकलंच का? आता काय काम व्हत नाय भौ,'' तुकाराम बोलला.

''म्हंजी, सोयरकीच्या कामाला निंघालास व्हय?'' पांडुरंगन विचारलं.

''कहाची सोयरक राव!

निघालो व्हतो कोरटाच्या कामाला. सुदामाच्या भांडणात एका बाजूनं साक्षीदार हाय म्या.''

''असं व्हय!'' पांडुरंग अचंब्यानं पुढं म्हणाला, ''मंग म्या हटकल्यान काय हुतंय? आरं समद्या अंधश्रद्धा असत्यात त्या.'' इतक्यात गुरुजी रस्त्यानं जाताना दिसले. गुरुजींनी विचारलं, ''काय पांडबा, कुणीकड निघालास?''

''म्या! न्हाय बा. ह्यो तुक्या चाललाय कोरटच्या कामाला.'' पांडुरंग बोलला. गुरुजी दोघांकडे पाहत होते. त्यांनी जरासा विचार केला. मग म्हणाले, ''हे बघा आपापसात भांडतात. हे काही चांगल नाही.''



''ते खरं आहे गुरुजी, पार आपल्या गावात लयच भांडणं बगा.'' पांडुरंग बोलला.

''अरे बाबा, आपल्याच गावात नाही. सगळीकडच भांडणं असतात. घरोघर मातीच्या चुली म्हणतात ना! अगदी तसंच. शहर असो का गाव असो, भांडणाला काय? ते कुठंही होतंय. जसं गाव तिथं उकिरडा तसं गाव तिथे भांडण.'' गुरुजी सांगू लागले.

''शहाण्यान कोरटाची पायरी चढू नै म्हंत्यात,'' तुकाराम म्हणाला.

''अगदी बरोबर बोललात. कोर्टाच नाव काढलं तरी अंगावर काटा यायचा माणसाच्या.''

''मग तंट्या बखेड्याचं वो?'' तुकारामाचा प्रश्न.

''पूर्वी लहान सहान तंटे-बखेडे गावातच मिटवले जात. गावची शहाणीसुरती माणसं एकत्र बसून मिटवत.''

''जुन्या काळातलं आता कुठं राह्यलंय गुरुजी? कोरट तर लयीच महाग झालंया. वकिलाची फी, कोर्टाच्या चकरा. चपला घासेस्तोर चकरा. सारक्या तारका वाढवून मिळत्यात. समदा वैताग हाय नुसता.'' तुकारामच्या बोलण्यात संताप होता.

''मी पण तेच सांगतो तुकादा. खूप दिवस कोर्टात प्रकरणं पडून राहतात. निवाडे करायला वेळ लागतो. खूप शक्ती खर्च होते माणसांची. त्यासाठी एक चांगला मार्ग काढलाय शासनानं.''

''एक चांगला मार्ग? अन त्यो कोणता वो?'' दोघंही एकदम बोलली.

''इथं रस्त्यावर काय सांगत बसू तुम्हांला? चला हॉटेलमध्ये चहा घेऊ या. तिथंच सांगतो निवांतपणे.''

मग तिघंही चावडीजवळच्या चहाच्या टपरीजवळ जाऊन बसले. चहा सांगितला. गुरुजी सांगू लागले.

''कोर्टातली काही प्रकरण निकाली काढण्यासाठी लोकन्यायालये निघाली आहेत.''

''हे काय भलतंच? पांडुरंगनं विचारलं.

''हे भलतंच नाही. लोकन्यायालय म्हणजे लोकांनी, लोकांसाठी, लोकांकडून चालविलेले न्यायालय,'' गुरुजी म्हणाले.

''अरे वा! हे त न्यारंच दिसतंय. पर गुरुजी, यात वकील असत्यात का?'' तुकारामनं विचारलं.

''असतात म्हणजे? बिल्कूल असतात. जज साहेबही असतात.''

''ही न्यायालये कुठ भरतात?'' पांडुरंगचा प्रश्न.

''कोर्टाच्या आवारातच भरतात. या लोकन्यालयाचेच पुढे लोक अदालत असे नाव रूढ झाले. तुंबलेले दावे यात निकाली काढतात. मुख्य म्हणजे लवकर निकाली निघतात,'' गुरुजी म्हणाले.

''मग आता कोरटाची गरजच काय?'' पांडुरंगनं आपली शंका बोलून दाखवली.

''पांडबा अरे, तसं नाही. लोक अदालत हा न्यायालयाचाच एक प्रकार आहे. एकाच दिवसात निकाल लागतो इथं.''

न्यायालयाच्या कामाचा बोजा कमी करण्यासाठी लोक अदालत.

दावे लवकर निकाली निघावेत यासाठी लोक अदालत.

पक्षकाराचा वेळ आणि पैसा वाचविण्यासाठी लोकअदालत. पंचमंडळी आपसात बसून भांडण मिटवतात. दोन्ही पक्षकारांना बोलावणं पाठवतात. विचारतात, 'कारे बाबा मिटवायचं का तुम्हांला?'

ते म्हणतात,. ''हो, कधी कधी काहीजण अडून बसतात. त्यांना समजवावे लागते. प्रकरणातले सगळे पक्षकार हजर पाहिजेत बरं!'' गुरुजी सांगत होते.

गुरुजी पुढे म्हणाले, ''ओळख म्हणून दोन बाजूच्या वकिलांची सही लागते.''

''अन् त्यांनी न्हाय दिली तर?'' पांडुरंगनं विचारलं. ''त्यांनी नाही दिली, तर कोणत्याही वकिलाची सही चालते. शेतीचे तंटे-बखेडे हाणामाऱ्या यात मिटवतात.''

''हे तर ब्येसच म्हणा की!'' पांडुरंग बोलला.

''ब्येस, आर हे तर फारच बेस्ट काम आहे. आपल्या आबा पाटलाचं वाटण्याचं प्रकरण यातच मिटवलं. अन् गोपाळाची बायको नांदत नव्हती ना! तेही लोकअदालतमध्येच मिटवलं. आता सुखानं संसार चालयाय त्यांचा.'' गुरुजी म्हणाले.

''गुरुजी, यात काही हार-जीत?'' तुकारामन विचारलं.

''बिलकुल नाही. दोघंही हसत-हसत घराकडं जातात. तडजोड झाल्यानं कोणालाच हरल्यासारखं वाटत नाही. दोघंही जिंकतात यात. तडजोडीनं मिटणारी प्रकरणंच यात नेहमी ठेवली जातात.''

चहा आला, तिघांनीही चहा घेतला. आपल्या सुदामचं प्रकरण यात ठेवता येईल काय? तुकाराम विचार करू लागला. पण अर्ज कोठे करावा?, माहिती कोठे मिळते?, कोण माहिती देतो? त्याला काहीच माहीत नव्हतं.

''गुरुजी, म्याबी सुदामाच्या एका परकरनात हाय. कोरटात लय चकरा माराव्या लागत्यात. ते मिटवायचं कसं?'' तुकारामन विचारलं.

यावर गुरुजी म्हणाले, ''लोकअदालत मोठ्या शहरात भरवतात. तालुक्याच्या गावालाही भरवतात. वकीलमंडळींच्या मदतीने लोकअदालत भरवतात. माणसांना आता यातले फायदे कळू लागलेत. माणसं आता हळूहळू जागृत होत आहेत. लोकअदालतमध्ये तंटे-बखेडे मिटवले पाहिजेत. काय, पटतंय काय?''

''पटतंय म्हंजे! अवो पटलंच पायजे!'' दोघंही एका आवाजात बोलले. पांडुरंग म्हणाला, ''चला आता आमी दोगबी जातो. सुदामच परकरन लोकअदालतीमधीच ठिवाया सांगतो. ते बी एक पुण्याचंच काम हाय की!''

आणि ते गुरुजींना 'रामराम' घालून वेगातच निघाले.

■■■

# 8. जवळपासच्या बाबी

**जरा जपून !**

सदाशिव : अगं पार्वते, झाला काय चहा? आणनं लवकर.

पार्वती : कुठची घाई एवढी?

सदाशिव : अरे वा, तुले माहीत नाही काय? किराणा सामान आणाचं हाय ना बाजारातून?

पार्वती : असं का? अं (चहा आणते) घ्या चहा.

सदाशिव : पार्वते, हा चहा कावून असा बेचव लागते, वं.

पार्वती : अव माय, कालच संध्याकाळी चहापत्ती आणली, दोन रुपयांची. तेच तर टाकली.

सदाशिव : पिऊनच पाह्यनं घोटभर. नाहीत तू म्हनशीन कसं म्हणते?

पार्वती : आ वो; खरंच माय, तुमी म्हणता तेच खरं आहे. काही चवच नाही. आन थोडा कडू पन लागते, गड्या.....

सदाशिव : चहाचा पुडा नाही आणला काय तू ?

पार्वती : नाही. कागदात बांधून आणली होती चहापत्ती.

सदाशिव : असं होय!

गुरुजी : सदाशिवराव... अहो सदाशिवराव आहेत का घरी ?

पार्वती : गुरुजी, आले वाटत. आवाज द्याना त्यांना.

सदाशिव : या, या. तुमी बऱ्याच दिवसांनी येणं केलं. कसे काय आले?

गुरुजी : आमची आत्या राहयतेना बाजूले. तिच्या पोराची तब्येत ठीक नाही, म्हणून आलो होतो.

पार्वती : असं काय झालं त्याले एकाएकी?

गुरुजी : काय होणार? बाजार होता ना परवाचा. स्वस्त भेटली, म्हणून मिठाई आणली, खाल्ली खूप. थोड्या वेळान झाल्या म्हणे उलट्या सुरू. अन् चक्कर आल्यासारखंही वाटे म्हणे.

पार्वती : कमी जास्त काही खाण्यात आल असंन.

गुरुजी : कमी जास्त काय? मिठाईत भेसळ असणार. ते काही सहन झालं नाही. आता साखर महाग झाली ना? तर साखरेसारखी गोडी असणारी एक वस्तू आहे.

पार्वती : असं काय नाव आहेजी त्या वस्तूच?

गुरुजी : सकरीन म्हणतात. मोठी घातक असते. ते आपल्या तब्येतीस, थोडीसी सकरीन टाकली, तर खूप मोठी साखर वाचते. कधीकधी स्वस्त मिठाईत टीप कागदाचे तुकडे, किंवा इतर काही वस्तूंची ही भेसळ करतात. दुसरं असं की, मिठाईत जे रंग असतात, हे सगळं आपल्या खाण्यात आलं तर तब्येत बिघडणार नाही तर काय?

पार्वती : असंही लोकांच्या जिवाशी खेळते? काय म्हणाव अशा लोकाइले?

गुरुजी : स्वार्थासाठी. स्वतःच्या फायद्यासाठी लोक काहीही करायला तयार होतात, अन् कोणत्याही पदार्थात भेसळ करतात.

पार्वती : अव माय! त्या चहापत्तीत तसंच काही असन काय?

सदाशिव : दाखवून पाह्य बरं, गुरुजीले ये चहापत्ती?

गुरुजी : का बरं, काय झालं?

सदाशिव : ह्या चहापत्तीचा चहा केला, त्यो पानचट अन् कडवट लागला.

गुरुजी : अंह, काहीतरी भेसळ असंन त्याच्यात, असं वाटत. हे पाहा पार्वतीबाई, आपल्याला शंका आली, तर एक प्रयोग करून पहायचा.

पार्वती : आम्मय बाई, आता आमाले कुठी परयोग अं मरयोग, बाप्पा!

गुरुजी : अतिशय सोपा आहे. तो बाजारात टीप कागद मिळतो ना?

पार्वती : तो शाई टिपाचा

गुरुजी : बरोबर, तर त्या टीप कागदाचा एक तुकडा घ्यायचा. तो ओला करून त्यावर चहाची पावडर टाकायची. समजा त्या कागदाला रंग आला, तर भेसळ आहे समजायचं.

सदाशिव : हे कायची भेसळ असते गुरुजी?

गुरुजी : वा फार चांगला प्रश्न विचारला. अहो सदाशिवराव काही लोक वापरलेली चहापत्ती वाळवतात. त्याला, फेरस सल्फेटचे लोहक्षार म्हणतात, त्याचा रंग देतात, काही लोक त्यात मिसळणारा कुठलाही रंग वापरून चांगल्या चहापत्तीत त्याची भेसळ करतात. मग तुम्ही म्हणता अशी गडबड होते. ते रंग आपल्या तब्येतीस अपायकारक असतात.

पार्वती : माय, माय असं हा दुसऱ्याच्या जिवाशी खेळ करतात? काय म्हणाव ह्या लोकांना?

गुरुजी : पार्वतीबाई एवढंच नाही! बाजारात मिळणाऱ्या अशा खूप वस्तू आहेत, की त्यात प्रचंड प्रमाणात भेसळ असते.

पार्वती : मंग, याहिले सरकार पकडत नाही? काय म्हणावं?

गुरुजी : पकडते ना, पण त्यासाठी आपण सरकारला मदत करायला हवी.

सदाशिव : आता आपण काय मदत करणार?

गुरुजी : का नाही? आपल्या गावात ग्राहकमंच आहे. त्यांच्यामार्फत किंवा आपण स्वतः तशी तक्रार जिल्ह्याच्या ठिकाणी करू शकतो. जिल्ह्याच्या ठिकाणी खाद्यपदार्थ तपासणी अधिकाऱ्यांचे ऑफिस असते. ते अधिकारी अशी तक्रार असणाऱ्या दुकानातून खाद्यपदार्थांचे नमुने गोळा करून प्रयोगशाळेत पाठवितात. समजा भेसळ आहे, आढळून आले, तर भेसळ करणाऱ्याला शिक्षा करण्यात येते.

सदाशिव : शिक्षा कशी काय असते म्हणावं?

गुरुजी : भेसळ करणे हा गुन्हा आहे. असा कायदा 1954 सालीच करण्यात आला, परंतु 1985 सालापासून सरकारने त्यामध्ये विशेष लक्ष घातले. या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करायला सुरवात केली.

सदाशिव : पण शिक्षा कोणती असते. ते नाही कळलं ना.

गुरुजी : हो ते विसरलोच बघा सांगायचं. भेसळ करणाऱ्याला 6 महिने सक्तमजुरी आणि कमीतकमी शंभर रुपये किंवा त्यापेक्षा जास्त दंड भरावा लागतो.

पार्वती : आवो माय, मग हे भेसळवाले पकडण्याच्या कामी सरकारची माणसं असतीन म्हणावं.

गुरुजी : आहेत ना! ते काय सांगायची गोष्ट होय? आपल्या महाराष्ट्रात 200 च्यावर अन्न भेसळ निरीक्षक आहेत आणि 25 पेक्षा जास्त पर्यवेक्षक आहेत.



पार्वती : अजून कोणत्या गोष्टीत भेसळ राह्यते म्हणावं? सांगाना थोडसं.

गुरुजी : आजकाल ते काही विचारू नका. तशी ही यादी तर बरीच लांबलचक होईल, पण मी तुम्हांला आपल्या नेहमी वापरातील काही वस्तूंविषयी सांगतो.

पार्वती : सांगा ना जी. अन् भेसळ कशी ओळखायची, तेबी सांगा?

गुरुजी : हे बघा, कधी कधी चण्याच्या डाळीत लाखाची डाळ मिसळतात. लाखाची डाळ नेहमी खाण्यात आली, तर लोथिरीझम नावाचा रोग होतो.

पार्वती : पण हे ओळखायचं कसं म्हणते मी?

गुरुजी : तसं ते थोडं कठीणच आहे, पण या डाळीच्या डाळिंब्या कमी अधिक आकाराच्या असतात. यावरून ही लाखाची डाळ आहे हे लक्षात येऊ शकते. तसंच गोड्या तेलातही लोक भेसळ करतात.

पार्वती : हो ना जी. एखाद्या वेळी तेलात गाळ असा येते का बस! तळण काढावं तर खूपच धुपट होते. कधीकधी तेलान घसा धरते अन् खोकल्याचा त्रास होतो.

गुरुजी : आता सांगा बरं, हा त्रास कसा होत असतो?

सदाशिव : हा त्रास तेलात भेसळ असल्यान होत असंन.

गुरुजी : सरकी सारखं तेल गोड्यातेलात मिसळून भेसळ करतात. हे तेल आपल्या खाण्यात आल्यामुळे अनेक आजार होतात. पाय सुजतात, दृष्टिदोष निर्माण होतो.

सदाशिव : बापरे केवढी हरामखोरी करतात लोक? पण भेसळ कशी ओळखायची जी? अनेकवेळा वेलदोड्याला बाहेरून चेहऱ्याला लावण्याची पावडर घोळतात. त्यामुळे निकृष्ट वेलदोडे चकाकल्यामुळे चांगले वाटतात आणि आपली फसवणूक होते. अजून काही प्रयोग आहेत काय जी?

गुरुजी : सदाशिवराव प्रयोग तर खूप आहेत. त्यांपैकी घरी करता येण्यासारखा एक प्रयोग सांगतो.

पार्वती : सांगा जी.

गुरुजी : आपण बाजारातून हिंग आणतो. बऱ्याचवेळा त्यात भेसळ असते. हिंग जर चांगला असेल, तर तो टाकल्यास पाणी दुधाळ रंगाचं होते. चांगल्या हिंगाचा तुकडा विस्तवावर धरला तर छानपैकी ज्योत धरते.

पार्वती : मोठ महत्वाचं सांगितलं जी तुम्ही. आता मी पापडासाठी हिंग आणते, तेव्हा करून पाहीन तसं.

गुरुजी : म्हणजे पापड तुम्ही घरीच करता वाटतं.

पार्वती : हो जी, विकतचे परवडत नाही, अन् आपल्या घरचे चांगलेच राहत्यात.

गुरुजी : वा, छान. घरच्या घरी करता येण्यासारखे जे पदार्थ आहेत, ते आपण घरीच केले पाहिजे.

पार्वती : आता मी मिरची पावडर, हळद, मसाले घरीच करीत जाईन. मग भेसळचे पदार्थ पोटात जाणार नाहीत.

गुरुजी : ही भेसळ ओळखणंही सोप आहे. त्यासाठी नायट्रिक ॲसिडचा थेंब खाण्याच्या तेलात घालून बघावा. तेलाला लालसर रंग आला की ते तेल भेसळयुक्त आहे, असं समजायचं.

पार्वती : गुरुजी, बाजारातली मिरची पावडर तर लालभडक दिसते, अन् स्वस्तही वाटते. मले वाटते त्यातही भेसळ राहत असन.

गुरुजी : सगळ्याच नाही, पण काही कंपन्या तिखट अधिक लाल, आकर्षक दिसण्यासाठी पाण्यात लालरंग मिसळून त्यावर शिंपडतात. कधीकधी तुरीचा लालकोंडा असतो ना, तोही मिसळतात.

पार्वती : अजून कोणत्या वस्तू आहेत, ज्यात भेसळ होऊ शकते?

गुरुजी : दळलेला कथ्था. त्यामध्ये सुपारीचा चुरा किंवा लाकडाचा भुसा मिसळल्याचे आढळून आले आहे. आपण हळदीची पावडर बाजारातून आणतो, त्यात मेटाथिल यलो नावाचा पिवळा रंग मिसळतात. त्यात कधी धानाच्या भुशाचाही उपयोग केल्याचे आढळून आले.

पार्वती : गुरुजी, मिऱ्यातही भेसळ असते, असं काही आईकलं जी आम्ही.



गुरुजी : आपली तब्येत चांगली राहावी यासाठी तुम्हांला एक म्हण माहीत आहे.

पार्वती : सांगा ना.

गुरुजी : देही आरोग्य नांदते, भाग्य नाही यापरते.

सदाशिव : वा वा! छान आता या भेसळीच्या पदार्थापासून दूर राहण्यासाठी काही उपाय असन तर सांगा ना.

गुरुजी : हे बघा सदाशिवराव, बाजारातल्या रस्त्याच्या बाजूला असलेले उघड्यावरचे खाद्यपदार्थ घेऊ नये. अशा पदार्थांवर धूळ असते आणि भेसळही असण्याची शक्यता असते. दुसरे असे, की किंमत कमी म्हणून मोहात पडू नये. पदार्थाचा दर्जा काय आहे ते पाहावे.

पार्वती : आयका, आयका! नाहितं तुमी, काहीही सस्त भेटलं का पहिले घेऊन येता.

सदाशिव : आता चूप राह्यान. आयकू दे, गुरुजी सांगून राह्यले ते.

गुरुजी : बरोबर आहे पार्वतीबाईंच म्हणनं. वस्तू थोडी महाग असली तरी चालेल, पण वस्तू पारखून घ्यावी, कारण त्याचा संबंध आपल्या आरोग्याशी आहे.

आरोग्याकडे, आपल्या तब्येतीकडे दुर्लक्ष करून आपण सुखी जीवनाचे स्वप्न पाहू शकत नाही.

■ ■ ■

# 9. डिजिटल साक्षरता

## ऑनलाईन खरेदी-विक्री

आई : कुणाल, अरे कुणाल, आवर लवकर. आपल्याला किराणा सामान आणायला जायचं आहे. थोडे कपडेही घ्यायचे आहेत. चल, आवर लवकर.

कुणाल : आई, आज नको गं! मला खूपच कंटाळा आला आहे. आज मला सुट्‌टी आहे. खरेदीला गेलो, तर मला खेळायलाही मिळणार नाही.

आई : अरे, असं काय करतोस! आपण लवकर परत येऊ आणि काय रे मी तुला कपडेही घेऊन देईन म्हटलं ना, तरीही तू नाही म्हणतोस.

वडील : (कुणालच्या आईस) अगं, तुझा आणि कुणालचा वेळ कशाला वाया घालवतेस? आजकाल, सर्व वस्तूंची खरेदी घरबसल्या करता येते. ऑनलाईन पद्‌धतीने!

आई : मला कुठे येते ऑनलाईन खरेदी करता?

वडील : मी शिकवतो ना, तुला ऑनलाईन खरेदी कशी करायची ते; यामुळे तुझा वेळही वाचेल आणि श्रमही वाचतील. तू प्रयत्न करशील, तर हे तू नक्कीच शिकशील.

आई : अहो, तुमचेही बरोबर आहे, की घरबसल्या ऑनलाईन खरेदी केल्याने कितीतरी कामे सोपी होत आहेत. मला माझ्या कामाच्या पद्‌धतीत बदल केलाच पाहिजे. आजपासून मीही ऑनलाईन खरेदी करण्याचा नक्कीच प्रयत्न करीन.






वडील : बरोबर आहे. काळानुरूप प्रत्येकानेच नवनवीन बदल स्वीकारले पाहिजेत. अगं, आता बऱ्याच गोष्टी सर्व लोक घरी बसून मागवत असतात; मग त्या खाण्याच्या असो की, गृहोपयोगी असो; परंतु ऑनलाईन खरेदी करताना आपण सावधगिरी बाळगली पाहिजे.

ऑनलाईन पैसे देताना प्रथम तुम्ही सर्व पोर्टलवर एकच पासवर्ड वापरत नसल्याचे अगोदर सुनिश्चित करा.

तुम्ही ऑनलाईन खरेदीसाठी डेबिट किंवा क्रेडिट कार्ड वापरत असल्यास, दर तीन महिन्यांनी तुमचा पिन क्रमांक बदलत रहा, तसेच वस्तू मिळाल्यावर ती उघडताना त्याचे व्हिडीओ शुटींग करावे.

एखाद्या वेळेस हवी ती वस्तू नाही मिळाली किंवा नादुरुस्त असली, तर व्हिडिओ दाखवता येतो आणि ती वस्तू आपल्याला परत सुद्‌धा पाठवता येते, म्हणून लोक ऑनलाईन खरेदीकडे आकर्षित होतात.

आई : हो खरंच! आजपासून आपण ऑनलाईन खरेदी करू.

कुणाल : हो आणि सगळी काळजी घेऊनच.

# 10. नैसर्गिक आपत्ती

**मुंबापुरी बुडाली पाण्यात!!!**

शनिवार, दिनांक २६ जुलै २००५. मुंबईत सतत पडलेला ९४४ मिमी पाऊस. मुंबापुरी पाण्याखाली गेली होती. तीन दिवस शहर बंद होते. नेहमी लगबग, धावपळ असणारी मुंबई बंदच पडली.

महानगरी मुंबईत महापूर आला होता. सुरभी हॉस्पिटलमधून गाडीने परतत होती. वाटेत ती पुराच्या पाण्यात अडकली. काय घडते ते कळायच्या आतच तिची गाडी पाण्याखाली गेली.

सुनिधी विद्यालयातून बसने येत होती. अचानक बस थांबली. वाहनचालक ओरडला, गाडी पुढे जाणार नाही. पुढे पाणी आहे.

सर्वजण उतरले. समोर जिथवर दिसेल तिथे पाणीच पाणी होते.

पावसात नीट दिसतही नव्हते. वाहने पुष्कळ होती. पण पाण्यात शिरणार कोण?

सुनिधीचे घर तिथून जवळच होते, पण या स्थितीमुळे ती दुसऱ्या रस्त्याला वळली. पुराच्या पाण्याला वळसा घालून जाता येईल का, ते पाहावे असे तिने ठरवले. दुसऱ्या रस्त्याला फार पाणी नव्हते. पाऊलभर पाणी होते. ती त्यात चालू लागली. पाणी गुडघ्यापर्यंत आले तरीही ती जात होती.



मुंबईच्या पावसाळ्यात हे काही नवीन नव्हते. तिच्या शेजारून एक बस गेली, त्याने साठलेले पाणी आजूबाजूला जोरात आले. पाणी कापून ती बस निघून गेली, पण त्यामुळे निर्माण झालेल्या लाटेने सुनिधीचा तोल गेला. ती पाय घसरून पाण्यात पडली.

स्वत: लाटेबरोबर खोल पाण्यात गेली. तिने धडपड केली पण तिच्या पायांना जमीन लागेना. नाकातोंडात पाणी जाऊन तिचा जीव घाबराघुबरा झाला. तिला पोहायलाही येत नव्हते. सभोवताली कुणीही नव्हते. महापुराने आणखी एक बळी मिळवला.




मुंबानगरीच्या या महापुरात प्राण व मालमत्तेची बऱ्याच प्रमाणात हानी झाली, पण अचानक असा महापूर येण्याची कारणे काय होती?

मुंबईच्या महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांनी सतत ४८ तास खपून खुल्या गटारातून सहा ट्रक भरून कचरा काढला. त्यात प्रत्येक वस्तू प्लॅस्टिक पिशव्यांच्या थरात लपेटलेली होती..

लोक प्लॅस्टिकच्या पिशव्या फेकून देतात. त्या उडत जाऊन नाल्यात पडतात, तिथून वाहून जाता जाता एखाद्या अडथळ्याशी अडकतात तिथेच साठतात आणि नाल्याचे तोंड बंद करून टाकतात, त्यामुळे पावसाचे पाणी समुद्रात वाहून जाऊ शकत नाही. जसजसा पाऊस पडत जातो, पाणी साचत जाते आणि मग महापुरासारखी आपत्ती येते.

# 11. घड्याळ

**वेळ**




मी घड्याळ. माझे काम सर्वांना वेळ सांगून वेळेचे महत्त्व समजावणे आहे. मित्रांनो, मी एक घड्याळ आहे. आजच्या धावपळीच्या काळात प्रत्येकजण पुन्हा–पुन्हा माझ्याकडे पाहून आपली कामे करत असतो. मला एका खाजगी कार्यालयाच्या भिंतीवर लावण्यात आले आहे. या कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीची दृष्टी माझ्यावर पडते. मी देखील चारही बाजूंना काय चालले आहे ते पाहू शकते.

माझा रंग लाल आहे व मी दिसायला खूप सुंदर आहे. मला एका घड्याळाच्या कारखान्यात तयार करण्यात आले आहे. प्लॅस्टिक, स्टील इत्यादींचा वापर करून मला तयार केले. यानंतर तेथून काही लोक मला इतर घड्याळांबरोबर बाजारात घेऊन आले. बाजारातील एका प्रसिद्‌ध घड्याळाच्या दुकानात मला पाठवण्यात आले. दुकानदार मला इतर घड्याळांसोबत काचेच्या पेटीत ठेवत असे. दिवसभरात भरपूर ग्राहक त्या दुकानात घड्याळ खरेदी करायला येत असत. जवळपास दहा ते पंधरा दिवस मी फक्त ग्राहकांनाच पाहत राहिले. मला कोणीही खरेदी करीत नव्हते.

एके दिवशी संध्याकाळी एक श्रीमंत व देखणा तरुण त्या दुकानात आला. येताच क्षणी त्याची नजर माझ्यावर पडली. तो तरुण एका मोठ्या कंपनीचा मालक होता. बाजारात खरेदी करताना त्यांच्या लक्षात आले, की त्याच्या कार्यालयात घड्याळाची आवश्यकता आहे.



त्याने दुकानदाराला मला पॅक करून द्यायला सांगितले. गाडीच्या मागील सीटवर बसवून तो मला त्याच्या कार्यालयात घेऊन गेला. त्याने आपल्या शिपायास सांगून मला एका उंच जागी लावण्यास सांगितले, जेणेकरून सर्वांची नजर माझ्यावर राहील.

शिपायाने मला कार्यालयाच्या मुख्य दरवाज्यासमोरच टांगून दिले. तेव्हापासून तर आजपर्यंत मी येथेच आहे. येथील प्रत्येकजण आपापल्या कामात व्यस्त असून सुद्धा, दिवसभरातून अनेकदा माझ्याकडे पुन्हा पुन्हा बघत असतात आणि आपले नियोजित कामे करत असतात.

एकूण घड्याळ ही आपल्या आयुष्यातील खरोखर महत्त्वाची गोष्ट आहे, जी आपल्याला योग्य वेळापत्रकासह आपले जीवन टिकवून ठेवण्यास मदत करते. वेळेच्या योग्य व्यवस्थापनासह एक शिस्तबद्ध दिनचर्या आपल्याला आपल्या वैयक्तिक तसेच व्यावसायिक आयुष्यात नेहमीच यशस्वी करेल.

# 12. यात्रा

ज्या देशाची आपल्याला सेवा करायची आहे, ज्या समाजाची आपल्याला सेवा करायची आहे; तो देश, तो समाज एकदा डोळ्याखालून घालावा, म्हणून स्वामी विवेकानंदांनी हिमालयापासून कन्याकुमारीपर्यंत भारत यात्रा केली.

पोरबंदरच्या वास्तूलयामध्ये स्वामी विवेकांनद काही इंग्रजी ग्रंथाचे खंड वाचत असत. ते रोज एक खंड वाचायचे आणि तो ग्रंथपालाला परत करायचे. त्यांनी तीन खंड एकेका दिवसात वाचून परत केले.

ग्रंथपालाने स्वामीजींच्या शिष्याला विचारले, की ''स्वामीजी न वाचता परत करतात वाटतं, कारण एका दिवसामध्ये एवढा मोठा खंड वाचून होणे अशक्य, असे घडू शकत नाही. काही लोकांना ग्रंथालयातून जाड-जाड पुस्तकं न्यायची आणि न वाचता ती परत करायची सवय असते. थोडं पुस्तक चाळायाचं आणि वाचल्यासारखं दाखवायचं, तसंच बहुतेक हा साधू करत असेल.'' शिष्यानी हे सगळे संभाषण स्वामीजींना सांगितले.

चौथ्या दिवशी चौथा खंड घेण्यासाठी स्वामीजी स्वतः गेले. त्यांनी तो खंड ग्रंथपालाकडे मागितला आणि त्याला सांगितले, ''पहिले तीन खंड माझे पूर्ण वाचून झालेले आहेत. तुम्हांला शंका असेल, तर त्यातले तुम्ही काहीही विचारू शकता'' आता स्वामीजींनीच आव्हान दिल्यामुळे ग्रंथपालाने विचार केला, की हे जाणून घेऊया, की ते किती प्रामाणिक आहेत. ग्रंथपालाने स्वामीजींना त्या तीन खंडातले उभे आडवे प्रश्न विचारले. तो जे प्रश्न विचारायचा, त्याचे उत्तर ज्या पानावर असायचे ते अर्धे – पाऊण पान स्वामीजी तोंडपाठ सांगायचे.




हे पाहून ते ग्रंथपाल म्हणाले, हे मानवी कक्षेच्या बाहेरचे काम आहे. म्हणजे कोणत्याही माणसाला न झेपणारे.

खेत्रीच्या महाराजांनी एकदा स्वामीजींना विचारले, ''स्वामीजी एवढे लक्षात ठेवणे तुम्हांला कसे शक्य होते?'' स्वामीजींनी सांगितले, ''मी माझं मन कुठेही एकाग्र करू शकतो. तसेच माझा तास न् तास ध्यानाचा अभ्यास असल्यामुळे मी जे काही वाचतो, त्यावर मन केंद्रित झाल्यामुळे माझ्या ते लक्षात राहते व पाठ होऊन जाते.'' पुढे स्वामीजी म्हणाले,'' असं बघा राजेसाहेब, आपण मुलांना अक्षरे शिकवतो आणि त्यानंतर वाक्य वाचता येणे, वाक्य लिहिता येणे, आपल्या शिक्षणाची शेवटची पायरी आहे. त्यापुढे जाऊन जर प्रयत्न

केला, तर आपल्या मनाची, बुद्धीची आणि इतर इंद्रियांची शक्ती आणखी विकसित होऊ शकते आणि आपल्याला एकदम परिच्छेद वाचता येऊ शकतो. मी ग्रंथांचे परिच्छेद एका दृष्टिक्षेपात वाचतो. काही ग्रंथांची पानेच्या पाने मी वाचू शकतो.

जेव्हा स्वामी विवेकानंद कन्याकुमारीला आले तेव्हा त्यांनी कन्याकुमारीचे दर्शन घेतले. त्यांच्या मनाला अतिशय आनंद झाला आणि दर्शन घेऊन ते समुद्राच्या काठावर उभे राहिले. सगळीकडे अनंत, अथांग असा तीनही दिशेला पसरलेला सागर. अचानक स्वामीजींचे लक्ष मध्यभागी एक–दीड फर्लांग अंतरावर असलेल्या दोन शिलाखंडांवर गेले. त्यांनी विचार केला की, समोरच्या शिलाखंडांवर आपण गेलो तर त्यांनी तिथे असलेल्या नावाड्यांना विचारले, ''ते काय आहे?'' नावाडी म्हणाले, ''त्याला श्रीपाद शिला म्हणतात.'' स्वामीजींच्या मनात आले की, आपली भारत यात्रा आता संपत आहे. आपण देशाच्या टोकापर्यंत आलेलो आहोत. ते देशाचे टोक नाही. समोरचा शिलाखंड हेच देशाच टोक आहे. त्या शिलाखंडावर आपण जावे. कन्याकुमारीच्या चरणी आपली भारत यात्रा समर्पित करावी. या भावनेने स्वामी विवेकानंदांनी एका नावाड्याला सांगितले, ''बाबा रे, मला तू त्या शिलाखंडावर सोड.'' नावाड्याने सांगितले, ''तुम्हांला मला पाच पैसे द्यावे लागतील.'' तेव्हा स्वामीजी नावाड्याला म्हणाले, '' माझ्याकडे पैसे नाहीत. मी तर संन्यासी आहे. ''त्यावर नावाडी म्हणाले,'' ते तुम्ही तुमचे बघा, आम्ही पैसे घेतल्याशिवाय तुम्हांला तेथे नेणार नाही,'' स्वामी विवेकानंदांनी एकदम त्या सागरात उडी मारली. स्वामीजींना हे माहीत नव्हते की, कन्याकुमारीच्या त्या समुद्रात शार्क जातीचे मासे आहेत आणि त्या शार्क माशांचा जबडा खूप मोठा असतो आणि त्यांचे दात हत्तीच्या सुळ्यांसारखे असतात. एखादा मनुष्य जर त्यांच्या जबड्यामध्ये सापडला, तर ते त्याला काकडीसारखे तोडून तोडून खाऊन टाकतात. जेव्हा स्वामीजींनी समुद्रात उडी मारली तेव्हा ते नावाडी घाबरून गेले आणि त्या दोघा तिघांनी आपापल्या नावा काढल्या आणि स्वामीजींचा पाठलाग सुरू केला. त्यांना वाटले की, या माणसाला वाटेत काही संकट आले तर, दम संपला तर. स्वामीजी त्या शिलाखंडावर पोहोचले. त्या नावाड्यांच्या लक्षात आले



की, हा संन्यासी सामान्य नाही. हा कोणीतरी अद्‌वितीय शक्तिशाली मनुष्य आहे.

स्वामीजी त्यांना म्हणाले, ''मी आता दोन-तीन दिवस इथेच राहणार आहे.'' तेव्हा ते नावाडी आणखी थक्क झाले. स्वामीजी तीन दिवस शिलाखंडावर राहिले. रात्री एकटे, सोबतीला कुणीही नाही. स्वामीजी तीन दिवस नुसते थांबले नाहीत, तर ते ध्यानस्थ बसले. त्यांना काहीतरी खायला द्यावे, म्हणून अनेकदा हे नावाडी त्यांच्यासाठी काहीतरी खाण्याचे पदार्थ आणायचे. त्यांना हाक मारायचे, पण त्यांच्या लक्षात आले, की हा संन्यासी सामान्य नसून, हा कोणीतरी अद्‌वितीय मनुष्य आहे.

स्वामीजी तीन दिवस आणि तीन रात्री तेथे राहिले. या तीन दिवसांत फक्त भारत मातेचे चिंतन करत होते. डोळ्यांसमोर त्यांना सतत दिसत होता, तो आपला भारत, भारतातील गोरगरीब जनता. स्वामीजींच्या लक्षात आले, की आपल्या देशातले अनेक लोक उपाशी आहेत, ज्यांना जेवायला अन्न नाही. त्यांना आपण वेदांतचा काय उपदेश करत असतो? भाकरीची भ्रांत असताना वेदान्त सांगणे खोटे आहे. लोकांना आधी दोन वेळ जेवायला द्या. खरा धर्म हा सूर्यासारखा सर्व प्रकाशक असतो. वसुंधरेसारखा सर्वसंग्राहक असतो. हे सर्वधर्म समन्वयाचे सूत्र समस्त समाजाला स्वामीजींनी समजावून सांगितले.

अशा पद्‌धतीने स्वामी विवेकानंदांनी भारत यात्रेदरम्यान सर्वधर्म समभावाची शिकवण दिली.

# 13. मतदान




लोकशाहीचे पालक

मतदानाचे दिवस जवळ येतात.
अनेक पुढारी भेटायला येतात.
मत द्या, असे म्हणतात.
गावासाठी हे करीन, ते देईन,
अशा घोषणा करतात.
जो येतो तो वेगळे काही करीन म्हणतो.
कोणी नाती–गोती सांगतात.
कोणी जात–पात सांगतात.
कोणी नोटांची पुडकी दाखवतात.
मतांचा भाव सांगतात.
मतदार भांबावून जातात.

पण याच वेळी विचार केला पाहिजे.
मत ही मोठी शक्ती आहे.
ती विचार करून वापरली.
तरच लोकशाही टिकून राहील.
सर्वांचे ऐकून घेऊ. डोळसपणे मतदान करू.
लोकशाहीचे रक्षण करू.

निवडणुका आल्या, की प्रचारसभा मोठ्या प्रमाणात होतात. आपल्या पक्षाचा, पक्षाच्या कार्याचा, निवडणुकीला उभे असणाऱ्या लोकप्रतिनिधींचा, त्यांच्या कार्याचा प्रचार करण्यासाठी प्रचारसभा घेतल्या जातात. त्यांच्यामुळेच ही सर्व माहिती लोकापर्यंत पोहोचू शकते आणि त्यामुळे लोक योग्य उमेद्‌वाराला मत देऊ शकतात. अशाच एका प्रचारसभेची ही गोष्ट.

अमेरिकेचे अध्यक्ष अब्राहम लिंकन हे पूर्वी दारू विक्रीचे काम करायचे आणि त्यांच्या विरुद्ध उभे राहिलेले उमेदवार स्टीफन हे त्यांच्या सभेत अब्राहम लिंकन विरुद्ध भाषणात सांगायचे, की ''अब्राहम लिंकन हे पूर्वी दारू विक्रेता म्हणून काम करायचे, दारूच्या दुकानात काम करणाऱ्या उमेद्‌वाराला तुम्ही अमेरिकेचे अध्यक्ष बनवणार का?'' म्हणून जनहो, तुम्ही मलाच निवडून द्या.




त्या प्रचार सभेतील स्टीफनचे बोलणे अब्राहम लिंकन यांना समजले. त्यांनी पूर्वी केलेल्या दारूच्या दुकानातील नोकरीचा गवगवा करण्याचा फायदा डग्लस घेत होता. लिंकन यांच्या लक्षात आले, की आपण लोकांना समजून सांगणे फार गरजेचे होते.

अब्राहम लिंकन यांनी आपल्या प्रचार सभेत लोकांना सांगितले, की ''जनहो माझे प्रतिस्पर्धी श्री. स्टीफन डग्लस यांनी माझ्याविषयी जे काही सांगितले ते खरे असून, मी पोटासाठी दारूच्या दुकानात काम केले. त्यावेळी श्री. डग्लस हे एक दिवसही खंड पडू न देता दारू पिण्यासाठी येत होते. त्यांना मीच दारू विकत होतो, तरी मी स्वतः पीत नव्हतो. थोड्याच दिवसात मला चांगली दुसरी नोकरी मिळाली आणि मी ती नोकरी सोडून दिली. श्री. डग्लस यांनी मात्र त्या दुकानात जाण्याचे व्रत अजूनही सोडले नाही, म्हणून जनहो, तुम्ही अशा नशा करणाऱ्या व्यक्तीस अध्यक्ष म्हणून निवडून देणार का?'' अशारितीने अब्राहम लिंकन यांनी त्यांचेच शब्द त्यांच्यावर उलटवले आणि अध्यक्ष म्हणून निवडून आले.

याप्रमाणे उमेदवाराची पात्रता पाहूनच उमेद्‌वारास मत द्यावे.

# 14. शेजारी

**तू खरंच मोहक आहेस!**

मी नुकतीच औरंगाबादला नोकरीनिमित्ताने बदलून आले होते. माझ्या घराशेजारी एक बाई राहत होत्या.

मी तिला विचारलं, ''तुझे नाव काय आहे?''

''मोहिनी'' तिने म्हटलं.

''मोहिनी, तू नावाप्रमाणेच मोहात टाकणारी आहेस. मला तू खूप आवडलीस.'' मी तिला हसून म्हटलं, तशी ती लाजली.

मला म्हणाली, ''बाई तुम्हांला बगून मला लई बर वाटलं!''

पुढे म्हणाली, ''शाळा शिकले असते तर मी बी वटमध्ये राहिले असते.''

मी तिला म्हणाले, ''मोहिनी, अगं खरंच तू पण छान आहेस. मला तुझ्याशी बोलाव वाटलं म्हणून मी तुझ्याजवळ आले.''

तिच्या जवळ असलेल्या मुलीकडे बघून बाई म्हणाल्या, ''मोहिनी, पहिली बेटी धनाची पेटी आहे. तिला चांगलं वाढव. दुसरं मूल होण्याची घाई करू नकोसं. पाळणा लांबव.

''बाई तुमी खरंच मला मोठ्या बहिणीसारख्या आहात. तुमी शिकल्या आहात. तुमाला सारं कळतं. मी शिकली नाही. मला काही कळत नाही.''



''अगं काय झालं मोहिनी तू अशी का दुःखी होतेस''

''बाई, अहो ही माझी पहिली मुलगी नाही.

''मग दुसरी आहे का? अगं त्यात काय झाले? आताच्या काळात मुलगा-मुलगी एकसमान आहेत. तू दुःखी होऊ नकोसं? मोहिनी तुझा नवरा नाराज आहे का?'' मी तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

त्यावर ती मला म्हणाली, ''बाई माझी मला लाज वाटते. खरं सांगू का? ही पाचवी मुलगी आहे माझी.''

मला तिच्या अडाणीपणाच वाईट वाटलं. मी तिलाच विचारलं.

मोहिनी, ''मग आता तरी ऑपरेशन केलंस की नाही? मुलासाठी वाट बघायची नाही.''

''नाही बाई, घरात कोणी लेकरांचं बघायला नाही.'' नवरा म्हणतो, ''मी कामाला जातो घरातलं मी बघणार नाही.''

''अगं, तुझा नवरा, ऑपरेशन का करून घेत नाही?

बाई दवाखान्यातल्या बाई पण असेच म्हणतात. माझी सासू त्या नर्सबाईलाच शिव्या देते.

मोहिनी तू कोणत्या कामाला जातेस गं?

''बाई इटा थापायला जाते.'' तिन हळूच उत्तर दिलं.

''नवरा काय काम करतो?''

''तेच काम करतो इटा थापायचं. बाई, एक सांगू का मला खूप शिकावंसं वाटतं. अंगणवाडीची ताई व्हाव वाटतं!''

अगं मोहिनी, शिकता येईल की तुला सुद्‌धा, आपल्याला वाटतं ते करावं. तुला सावित्रीबाई फुले यांचे नाव माहीत आहे का?''

मोहिनी म्हणाली, ''नाही बाई''

''अगं त्या पहिल्या महिला आहेत, ज्या शिकल्या आणि त्यांचा नवरा म्हणजे 'महात्मा जोतिबा फुले' यांनी मुलींची पहिली शाळा सुरू केली. सावित्रीबाई मुलींना शिकवू लागल्या. मुलींच्या मास्तरीण झाल्या. लोकांनी त्यांना खूप त्रास दिला. ते त्यांना खूप घाणघाण बोलत, दगडं मारत, अंगावर चिखल फेकत, शेणही फेकत असत, पण त्या घाबरल्या नाहीत. त्या शिकल्या आणि मुलींना शिकवलं. तेव्हापासून मुलींच्या शिक्षणाला सुरवात झाली.

त्यावर मोहिनी म्हणाली, ''बाई मला पण शिक्षणाची गोडी आहे. माझी मला लई लाज वाटते. माझ्या पाच पाच मुलींचे खाणे-पिणे, कपडेलत्ते करणे कठीण जाते, पण काय करू बाई? खूप उशीर झाला, पण माझ्या मुलींना मी खूप शिकवेन, मुलांसारखेच त्यांना मोठं करीन, त्यांचं नुकसान करणार नाही.''

बाई मोहिनीला म्हणाल्या, ''एवढे तुला समजले बरे वाटले. हिमतीने रहा. ऑपरेशन करून घे. मुलींना चांगले वाढव.

''हो बाई, मी बी ठरवलं आहे ऑपरेशन करायचे आणि मुलींना शिकवायचे. त्यांना आमच्यापेक्षा चांगले दिवस दिसले पाहिजेत.


'' वा ! वा !! मोहिनी, तू नावासारखीच मोहक आहेस.

मोहिनी बाईंना म्हणाली, ''बाई इतक्या दिवसापासून जे मनात दडले होते, ते मी तुम्हांला सांगितले, आता मला खरेच हलके वाटत आहे.''

■■■

# 15. स्वातंत्र्य सेनानी

## 1. गांधीजी



महात्माजींना लहान मुले खूप आवडत असत. एकदा एक मुलगा बापूजींकडे आला व म्हणाला ''बापूजी तुम्ही कपडे पूर्ण का घालत नाही?''

त्यावर बापू म्हणाले, ''मुला मी फार गरीब आहे. मी नवीन कपडे खरेदी करू शकत नाही.''

त्यावर तो मुलगा म्हणाला, ''मी माझ्या आईला सांगून तुमच्यासाठी नवीन कपडे आणतो.''

बापू त्या मुलाला म्हणाले, ''तू माझ्यासाठी नवीन कपडे आणशील, पण माझ्या कुटुंबातील इतर माणसांचे काय?''

त्यावर मुलगा म्हणाला, ''तुमच्या कुटुंबातील इतर माणसांसाठीही कपडे आणतो. बापू मला सांगा, किती कपडे शिवून आणू?''

त्यावेळेस बापू हसले आणि म्हणाले, ''पोरा, माझे कुटुंब म्हणजे हा संपूर्ण भारत देश. या देशातील जनता म्हणजेच ३७ कोटी लोक हे माझ्या कुटुंबातील सदस्य आहेत. जो पर्यंत त्यांना पूर्ण कपडे मिळत नाहीत, तोपर्यंत मी माझ्या अंगावर पूर्ण कपडे घालू शकत नाही.''

यावरून आपल्याला लक्षात येईल, की गांधीजींना भारतातील प्रत्येक माणसाची काळजी होती.

## 2. महात्माजींची कथा

एकदा आश्रमात खूप डास झाले होते. त्यांच्या त्रासामुळे आश्रमातील लोकांना पुरेशी झोप मिळेना. ही गोष्ट जेव्हा महात्माजींच्या कानावर गेली, तेव्हा त्यांनी उपाययोजना करण्याचे ठरविले.

आश्रमातील एका सदस्याने त्यांना म्हटले, ''बापुजी, एवढी कसली चिंता करता! मच्छरदाणी बांधून टाका. काम फत्ते!

गांधीजी म्हणाले, ''तुम्हांला काय वाटलं? मला मच्छरदाणीचा उपयोग माहीत नाही?

तेव्हा तो सदस्य म्हणाला, ''मग चला तर, मच्छरदाणी आणू.''

यावर गांधीजी म्हणाले, ''सद्‌गृहस्था, भारतात सर्वांनाच डासांचा त्रास चालू आहे. आपण किती जणांना मच्छरदाणी पुरविणार? असा काहीतरी उपाय हवा, की तो सर्वांनाच करता येईल.''

दुसरी व्यक्ती म्हणाली, ''तर मग बापू, रॉकेल अंगाला लावून झोपल्यास डास चावत नाहीत.''


गांधीजी म्हणाले, ''हाच उपाय बरा, जो सर्वांना करता येईल. तोच उपाय मी करेन.''

यावरून असे सिद्‌ध होते, की जनसामान्यांशी अशी नाळ जोडली गेली, तरच माणसे महत्त्वाच्या पदाला पोहोचतात.

■ ■ ■

# 16. खेळ

नीरज चोप्राने ऑलिम्पिकमध्ये सुवर्णपदक जिंकले. करोडो भारतीयांचा ऊर अभिमानाने भरून आला. संपूर्ण भारतात जागोजागी सोशल मीडियावर नीरज चोप्राचीच चर्चा होती.




रोहित, राधा व त्यांच्या मम्मी–पप्पांनी 'भालाफेक' खेळ टी.व्ही. वर पाहिला होता. ऑलिम्पिकमध्ये भारतीयांची शानदार कामगिरी बघून रोहित व राधा प्रभावित झाले होते. तेव्हापासून रोहित स्वतःला नीरज चोप्रा समजू लागला आणि राधासुद्‌धा स्वतःला नीरज चोप्रा समजू लागली आणि दोघे एकसाथ म्हणू लागले, ''चल मैदानात! चल मैदानात. ......!!''

रोहित व राधा मैदानात येऊन मित्र – मैत्रिणींबरोबर क्रिकेट खेळू लागले. तेवढ्यात एक काका येऊन म्हणाले, ''रोज फक्त क्रिकेटच खेळणार! अजूनही वेगळे खेळ आहेत, ते खेळ खेळा! मेडल घेऊन या. आता सर्व खेळांना खूप महत्त्व आहे.'' काकांचे बोलणे ऐकून मुलांनी खेळ बदलला. सगळ्यांनी एक साथ पळत जाऊन गेटला हात लावून परत जागेवर यायचे. जो मुलगा आधी गेटला हात लावून परत येईल, तो या खेळाचा विजेता असेल. सगळी मुले बंदुकीतील गोळीप्रमाणे सुसाट वेगात पळू लागली आणि गेटकडे धावली. रोहित खूप मागे होता. त्याने वेग वाढविला आणि वेगाने गेटकडे धावला. आता गेट खूप जवळ होते. रोहितला खूप आनंद होत होता. तो गेटला हात लावणारच होता, अचानक भीमा पुढे आला आणि पटकन गेटला हात लावून मागे फिरला आणि रोहित त्याच्याकडे बघतच राहिला.

रोहितनेही गेटला हात लावला आणि तो देखील भीमाच्या मागे पळू लागला. त्याला फक्त भीमाला हरवायचे होते. भीमा खूप वेगाने पळत होता. रोहितनेही वेग वाढविला आणि अचानक तो पाय घसरून पडला. तो जोरजोराने रडू लागला. आई त्याच्या पायाला औषध लावत होती. त्याच्यावर ओरडत देखील होती, ''काय गरज होती मैदानात मस्ती करण्याची? हजार वेळा सांगितले आहे, खेळणे कमी करा. अभ्यासावर लक्ष द्या.'' आई रागावतच होती. तेवढ्यात पप्पा आले आणि मम्मीला म्हणाले, ''एकदम चूक, अभ्यासाबरोबर खेळ सुद्‌धा आवश्यक आहे. आपण मुलांवर फक्त अभ्यासाचेच ओझे टाकतो आणि ऑलिम्पिकमध्ये मेडल

मागतो. मेडलसाठी मुलांना अभ्यासासोबत मैदान पण दिले पाहिजे.'' पप्पांचे बोलणे ऐकून रोहित रडत–रडत पप्पांकडे गेला आणि म्हणाला, ''पप्पा मी खूप वेगात पळतो...... पडलो नसतो तर आज मीच जिंकलो असतो.'' पप्पा म्हणाले, ''चिंता करू नको रोहित बाळा, सराव करूनच आपल्याला यश मिळते. उद्या सकाळी आपण परत मैदानात खेळायला जाऊ. तुझ्या मित्रांना पण सांग.''

रोहित आणि राधा एकदम खुश झाले. राधा म्हणाली, ''अरे व्वा! उद्यापासून आपण रोज मैदानावर खेळायला जाणार.

दुसऱ्या दिवशी पप्पांनी सर्वांना मैदानावर गोळा केले आणि शर्यत सुरू केली. वडिलांनी १,२,३ म्हणताच मुले पळू लागली. पप्पांनी पाहिले की, रोहित खूप मागे आहे आणि भीमा सर्वांत पुढे आहे. मुले गेटला हात लावून परत आली. ''भीमा खूप छान! अरे, रोहित काय झाले,'' पप्पांनी विचारले. त्यावर रोहित म्हणाला, ''पप्पा मला काल पायाला लागले होतं ना! म्हणून आज मी हळू पळालो. उद्या बघा, मीच पुढे पळणार आणि मीच जिंकणार.'' दुसऱ्या दिवशी सकाळीच शर्यत सुरू झाली. पप्पांनी पहिले की, रोहित दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि भीमा पहिल्या क्रमांकावर आहे. पप्पा म्हणाले, ''भीमा कीप इट अप, मुलांनो कुठे गेला तुमचा उत्साह! तुमची झोप पूर्ण झाली नाही का?'' रोहित म्हणाला, ''पप्पा मी कसे केले?'' पप्पा म्हणाले, ''तुझ्याकडे वेग आहे पण ताकद नाही, म्हणून तू मागे पडतोस.'' भीमा रोहितला म्हणाला, ''बघितलंस मी पण तेच म्हणत होतो आणि चालला मला हरवायला,'' अशा प्रकारे सर्व मुले रोज मैदानावर सराव करू लागली.

एकदा सकाळी सोसायटीच्या सेक्रेटरींनी सुद्धा मुलांची शर्यत पाहिली आणि म्हणाले, ''मुलांनो 'कीप इट अप'. आपण एक काम करू, तुमच्यापैकी प्रथम तीन मध्ये कोण आहे?'' रोहित म्हणाला, भीमा, मी, आणि राजा. सेक्रेटरी म्हणाले, ''ठीक आहे, दोन आठवड्यांनी सोसायटीसमोर या तीनही मुलांची शर्यत लावू. जो मुलगा जिंकेल, त्याला सोसायटीकडून मेडल देऊ आणि त्याबरोबर इतर स्पर्धा देखील ठेवू. जसे, स्विमिंग, बॅडमिंटन.'' सेक्रेटरी साहेबांचे बोलणे ऐकून सर्व मुले खूश झाली. पप्पा म्हणाले, ''चांगली गोष्ट आहे. तुम्ही सर्वांनी जोमाने सराव करा.'' अशा पद्धतीने सर्व मुले न चुकता दररोज मैदानावर सराव करीत होती.

एके दिवशी पप्पांनी पाहिले की, रोहित मोबाईलवर खेळ खेळता–खेळता काही तरी खात आहे. खाताना फक्त खाण्याकडे लक्ष दिले नाही, तर ते पचणार नाही असे पप्पांनी रोहितला सांगितले. ते म्हणाले, ''तू खूप अशक्त आहेस. ताकद वाढवायची असेल, तर जेवण आणि झोप याकडे नीट लक्ष दे. काल रात्री तू खूप उशिरापर्यंत मोबाईल बघत होतास. मेडल मोबाईलवर नाही तर मैदानावर मिळणार आहे.''

एकदा रोहित भीमाला भेटायला आला. भीमा टी. व्ही. समोर बसून जेवत होता. ते पाहून रोहित भीमाला समजावू लागला. या गोष्टीचा भीमाला राग आला आणि तो लगेच रोहितला म्हणाला, ''मला नको शिकवूस. मी जास्तीचा सराव करतो. डोळे बंद करून धावलो, तरी मीच पहिला येईन.'' आता रोहित रोज सकाळी

मैदानावर सराव करायचा, नंतर वेळेवर जेवून शाळेत जायचा. शाळेतून घरी आल्यावर अभ्यास करून, जेवून लगेच झोपायचा. असे दोन आठवडे निघून गेले.

सोसायटीत सेक्रेटरी साहेबांनी सांगितल्याप्रमाणे विविध स्पर्धा सुरू झाल्या. मुलांनी स्पर्धेत भाग घेतला. सुरवातीला बॅडमिंटनची स्पर्धा झाली. त्यात राधाचा प्रथम क्रमांक आला. सर्व स्पर्धा नियोजन केल्याप्रमाणे पार पडल्या. आता ज्या क्षणाची रोहित, भीमा आणि राजा वाट बघत होते, तो क्षण आला. म्हणजेच धावण्याची शर्यत.

सेक्रेटरी साहेब म्हणाले, '' जसे मी तुम्हांला सांगितले होते, की रोहित, राजा, आणि भीमा प्रथम तीन क्रमांकात आहेत. बघू आज मेडल कोण जिंकतंय !'' आणि धावण्याच्या स्पर्धेला सुरवात झाली. रोहित, भीमा आणि राजा एकसाथ पळू लागले. भीमा खूप वेगाने पळत होता. रोहित तिसऱ्या क्रमांकावर होता. सोसायटीतील लोक लक्ष देऊन स्पर्धा पाहू लागले. तीनही मुले खूप वेगाने पळत होती. थोड्या वेळाने रोहितने राजाला मागे टाकले आणि तो भीमाच्या बरोबर आला. भीमा खूप वेगाने पळत होता. रोहितपण वेगात पळत होता, पण भीमा पुन्हा पुढे गेला. रोहित खूप जोरात धावत होता. तेवढ्यात काय झाले काय माहीत, भीमाचा वेग कमी झाला आणि रोहित पटकन भीमापेक्षा पुढे गेला आणि रिबीन तुटली होती. रोहितने स्पर्धा जिंकली होती.



सेक्रेटरी साहेब म्हणाले, ''स्पर्धेचा विजेता आहे रोहित......'' मग काय ! सोसायटीतील सर्व मुले रोहितला धरून नाचू लागली. भीमा रोहितजवळ जाऊन म्हणाला, ''अभिनंदन मित्रा'' मला खूप गर्व झाला होता, की मीच स्पर्धा जिंकेन. पण आज मला कळले की, अति आत्मविश्वास धोकादायक असतो. रोहित, तू तर कमालच केलीस, किती ताकद वाढवलीस रे तू.

समारंभात सेक्रेटरी साहेबांनी रोहितला मेडल दिले. रोहितने सर्वांसमोर आपले मनोगत व्यक्त केले. सर्वांना उद्देशून म्हणाला, ''सर्वांना मनापासून धन्यवाद, ही तर सुरवात आहे, अजून पुढे मला अशीच मेडल्स मिळवायची आहेत. फक्त माझी सगळ्यांना एकच विनंती आहे, की मुलांना मोबाईलची सवय लावू नका. त्यांना मैदानी खेळ खेळण्यास प्रोत्साहन द्या. मैदानी खेळ खेळल्याने मुले सुदृढ, निरोगी राहतील; म्हणून म्हणतो, ''वाचून, लिहून बनू नवाब ...... . पण खेळून सुद्धा प्रगती करणारच ना जनाब'' रोहितचे हे बोलणे ऐकून सर्वांनी टाळ्या वाजविल्या. सगळ्यांनी रोहितचे नवे विचार स्वीकारले.

■■■

# 17. दारूचे व्यसन/दारूबंदी उठाव

आज मला सासरी येऊन, काही वर्षे झालीत. सासर आणि गाव तसं सुख समाधानाचंच होतं. गावातील प्रत्येकजण शेतात राबून आपला संसाराचा गाडा पुढे रेटत होती. माझाही संसार तसाच, माझा नवरा आणि मी दोघेही मिळून शेतमजुरी करायचो. अशातच एक आनंदाचा क्षण माझ्या आयुष्यात आला म्हणजे मला एक मुलगी झाली, तिचे नाव मोठ्या प्रेमानी 'आनंदी' असे ठेवले, परंतु म्हणतात ना आनंदाचे क्षण जास्त दिवस टिकून राहत नाहीत आणि तसेच झाले. गावात एकच कुजबूज सुरू झाली, कोणी म्हणे गावाच्या काठावर दारूचे दुकान उघडले. बस्, त्याचा विपरित परिणाम थोड्या दिवसातच गावावर पडायला लागला, जे लोक दररोज काबाडकष्ट करीत होती. ती आता दारूच्या गुत्त्यावर दिवसभर पडून राहायची, प्रत्येकाच्या संसाराची वाट लागली. गावात दररोज महिलांना मारझोड, शिव्यांची लाखोळी वाहिल्या जात होती. यातीलच माझा नवरा शंकर होता.

सुखी, आनंदाने चालणाऱ्या माझ्या संसाराला कुणाची नजर लागली देव जाणे! सुरुवातीला तो अधून मधून दारू प्यायचा, परंतु काही दिवसातच त्याला अति दारू पिण्याचे व्यसन जडले, मग काय तो माझ्या कमाईचे पैसे चोरून न्यायचा, दिवस–दिवस नुस्ता दारूच्या गुत्त्यावर किंवा गावाच्या पारावर पडून असायचा, घरी आला, तर मारझोड, भांडण हे नित्याचचं झालं होतं. या संकटातून बाहेर पडण्याचे मी ठरवले. मुलीला सोबत घेऊन सुमनबाईकडे आले. तिचाही संसार असाच चालू होता. गेल्या गेल्या ती धाय मोकलून रडायला लागली.

''आव माय रमे, तुले काय सांगू बाप्पा, माझ्या नवरा रोज दारू पिऊन येते. मारझोड करून कामाचे पैसे हिसकावून नेते. दोन घास सुखाचे खाऊ देत नाही, ना पोराईकडं लक्ष ना घराकडं लक्ष, पार माझ्या संसाराची वाट लावली या मसण्यानं...



''आवं थांब सुमे असं रडण्यानं अन् चुपचाप सहन केल्यानं काही होणार नाय, तुम्ही माझी आज सर्व्या गावभर बायाची एकच कहाणी आहे.''

''आता तुच काढ बाप्पा याच्यावर जालीम उपाय'' सुमा म्हणाली.

याच्यावर एकच रामबाण उपाय शोधला म्या. मी म्हणाली, ''आपण गावातल्या साऱ्या बायाईले जमा करू, तैले समजावून सांगू का गावातले दारूचे दुकान बंद कराचं आहे.

''त्यानं काय होईन बाप्पा,'' सुमा म्हणाली.

''आवं गावात दारूचं दुकाणच नसनं. ते काय पेईन आपले नवरे!

मी सुमनबाईला घेऊन, गावातील प्रत्येक स्त्रियांना भेटले, त्यांना गावात 'दारूबंदी' कशी करावयाची आणि आपल्या नवऱ्यांना त्यातून कसे बाहेर काढायचे ठरवले. सुरुवातीला दारूच्या व्यसनावर जनजागृती केली. खासकरून माणसांच्या विरोधाला सामोरे जावे लागले, घरात जास्त त्रास वाढला होता. त्याला न जुमानता आम्ही स्त्रियांनी दारूमुक्तीचा विडाच उचलला. दारूचे दुकान बंद करण्याकरिता मोर्चे काढले, गावात पथनाट्य सादर केले, आमच्या दारूबंदीची दखल शासनापर्यंत पोहोचली. काही दिवसांतच गावातील दारूचे दुकान कायमचेच बंद झाले. त्यादिवशी गावात स्त्रियांनी आनंदोत्सव साजरा केला.

माझ्या नवऱ्याला आणि गावातील दारू पिणाऱ्या लोकांना व्यसनमुक्ती केंद्रात पाठवून त्यांचे समुपदेशन करण्यात आले, आता त्यांना दारू किती वाईट आहे. तिने आपला संसार उध्वस्त केला, हे सारे समजून चुकले होते. पुन्हा सगळे काबाडकष्ट करून संसाराला हातभार लावत होती. माझाही नवरा माझ्याशी प्रेमाने वागू लागला, दारू सोडल्याने सगळ्यांचा संसार सुखा-समाधानाचा झाला.

■ ■ ■

# 18. वित्तीय साक्षरता (बँक व्यवहार)


शेवंता आज घरातील सर्व कामे अगदी लगबगीने करीत होती. घरात घरखर्चासाठी साठवलेले पैसे संपले होते म्हणून बँकेतून पैसे काढण्यासाठी तिला तालुक्याच्या ठिकाणी जायचे होते. तेथील स्टेट बँकेत तिने आपल्या मोलमजुरीचे पैसे साठविले होते. तसेच सरकारकडून मिळणाऱ्या निराधार आणि इतर योजनेचे पैसे याच बँकेत जमा होत होते. शेवंताने एकटीने न जाता सरलाताईला सोबत घेण्याचे ठरविले, तालुक्याची बस पकडण्याकरिता दोघीही बसस्टँडवर आल्या. थोड्या वेळाने त्या शहरात पोहोचल्या, लगेचच घाईघाईने शेवंताने बँकेत प्रवेश केला, सरलाही तिच्या सोबतच होती.

''आज तं बँकेत लयेच गर्दी हाये वं सरले'' शेवंता म्हणाली.

''लोकाईले थे पेन्शन का मेशनचे पैसे भेटते ना सरकारकडून, थेच काढाले आले ना समधे'' सरला म्हणाली.

जास्त उशीर करण्यापेक्षा शेवंता खात्यातून पैसे काढण्याची पर्ची घेऊन आली. ''आवं माय हे सिलीप घेऊन, काय फायदा, ना तुले भरता येते ना मले त्याच्यापेक्षा पोराकडून भरून घेऊ ना सिलीप'' सरला म्हणाली.

''नाही बाप्पा मी नाही भरत, परक्या माणसाकडून पैसे काढाची पर्ची, ना आपल्या ओळखीचा ना पाळखीचा, अशा भामट्यावर ईश्वास नाही ठेवाचा. मी तुले सांगतो सरले मांगल्या महिण्यात आपल्या गावच्या येनूबाईनं अशाच एका भामट्याले पर्ची देल्ली ना भराले. त्यानं पर्चीवर दहा हजारे लिहले आन हातात तिच्या देल्ले पांचहजार घरी गेल्यावर तिच्या नातवानं तिले सांगतलं का पासबुकावर दहा हजाराची एन्ट्री हाये आन तुले देल्ले पाचच हजार, पार फसली ना बिचारी, तरी मी तिने नेहमी म्हनो का तं बँकेचा सारा व्यवहार शिकून घे, पण थे कायची आईकते, आता बसली बोंबलत. जावू दे तिचं, तुले आपल्या गावाच्या परभ्याचं काही माहीत आहे का? काय झाले तेले,'' सरला म्हणाली.



आवं त्याले म्हणे बँकेच्या नांवावर एका बाईचा फोन आल्ता, लागला ना गुल-गुलु बोलाले, बोलण्याच्या नादात एटिएम कार्डाचा पिन होय काय म्हणे ईचारला, त्यानं देल्ला ना सांगुण, मंग काय एका मिन्टात सारं

खातं झालं रिकामं, पुरा एका लाखानं डूबलाना बाई थो तवा पासुन मी माह्या कानाले खळा लावला, का तं आपल्या बँक खात्याची माहिती द्याची नाही. स्वतःच सगळा व्यवहार कराचा, असं म्हणून शेवंतानं पैसे काढाची स्लिप स्वतःच भरली आणि पैसे मोजून पिशवीत ठेवले शेवंताचा बँक व्यवहार पाहून, सरलाला नवल वाटले.

''पण मले सांगा शेवंते हे समधं तू कुठून शिकली''

ये नाही का वं आपल्या गावात बचतगट चालवते.''

कोण... शोभाबाई (सरला म्हणाली)

''व्हयं तिच्याच कडून घेतलं ना, म्या सारं शिकून, तू पण घे बाई सगळं शिकून, म्हंजे, आपली फसगत होणार नाही.

हो बाई तुझ म्हन्न खरं हाथ, आजच भी थ्या शोभाबाईले भेटून सारं बँकेचं शिकून घेते. म्हंजे पुढच्या खेपेला माही पैसे काढायची सिलीप मी स्वतःच भरन, तुझ्या वाणी''

''माह्य मन्न पटलं ना तुले, आता घरी गेल्यावर संध्याकाई तुझ्या आजूबाजूच्या बायकाईले घेऊन ये, मी त्याईले बँकेचं सारं समजून सांगतो, का तं डोये उन्नडून पैशाचा व्यवहार करता जा, कोणाच्या भुलथापाले बळी पडू नका, स्वतःची पैशाची स्लिप स्वतःच भरा, म्हंजे कोणीच आपल्याला फसवणार नाही.

आता बैलासारखी मान हलवत बसू नको, चल अन् गावाले असे म्हणून शेवंता आपल्या गावी गेली. आज तिच्या चेहऱ्यावर वेगळीच खूशी दिसून येत होती; कारण तिने बँकेच्या पैशाचा व्यवहार स्वतःच केला होता, आर्थिक व्यवहार शिकल्यामुळे तिला आता कोणीच फसवू शकत नव्हतं.

# 19. डिजिटल साक्षरता

गावात दूरवर एका झोपडीत, भाकरी भाजण्याचा खमंग वास पसरला होता. घराच्या कौलारू छतावरून धुराचे लोट निघत होते. घराच्या अगदी जवळ गेल्यावर तुकारामांच्या अभंगाचे स्वर कानी पडले डोकावून पाहिल्यावर सखू चुलीवर भाकरी भाजत होती.

नवरा अगदी संसार अर्ध्यावर टाकून गेल्यावर सखूने आपला कुटुंबाचा गाडा एकटीने चालविला होता. मुलांना चांगल्या शिक्षणासाठी शहराला पाठविले होते. त्यासाठी ती रोज मोलमजुरीची कामे करीत होती. आजही ती शेतावर कामाला जाण्याची तयारी करीत सगळी कामे लगबगीनं करीत होती. एवढ्यात तिच्या कानावर कोणाचातरी आवाज पडला, लगेच घराच्या बाहेर येऊन पाहू लागली.

''अव माय बाई चित्रा होय काय.'' सखू म्हणाली.

''होना बाप्पा तुले इचाराले आल्ती'' चित्रा म्हणाली.

असं चित्रानं अचानकपणे विचारल्या प्रश्नाने सखू घांगावून गेली अवं तुबे काई माहीतच नसते बाप्पा

नुसती कामच करत राय अवं म्हणे गावातल्या बाया तीर्थयात्रेले चाल्ल्या, आन तैनं रेल्वेचं तिकीट पण बुक केलं म्हणे, तू नाही जाणार हाय तीर्थयात्रेले

'मले तं काही माहीतच नाही केलं गांवाच्या बायाईन ना ईचारलं, मंग सांग चित्रे मले कसं माहीत हुईन, आता त्याच्यात वेळेवर रेल्वेचं तिकीट कसं भेटन.'

चित्रानं सखूची तीर्थयात्रेला जायची ओढ आणि प्रवासाला जाण्याची अडचण जाणली होती. असं कर सखू तू कानई तुझ्या पोराले सांगुन उद्या रेल्वेचं तत्काल टिकीट काढून घे.

''हे बाई तू एकदम बरोबर बोल्ली, आजच भी पोराले सांगून रेल्वेच तिकीट काढून घेतो. काही वेळातच चित्रा आपल्या घरी निघून गेली. सखूने तीर्थयात्रेला जाण्याच्या तयारीकरिता उंचावरून भली मोठी बॅग काढून, त्यात आवश्यक असणारे कपडे, वस्तू टाकायला सुरुवात केली.

सकाळी सखूच्या मुलाने कोणाच्या तरी हातून रेल्वेचे 'तत्काल' तिकिट पाठविले होते. तिकिटावरची वेळ आणि गाडी नंबर तिने समजावून घेतला. काही तासभराच्या वेळाने तिने रेल्वेस्टेशन गाठले, रिक्षातून सामान उतरून, रेल्वेचा दादरा चढू लागली, तिची गाडी ज्या ठिकाणी लागणार होती त्या प्लॅटफार्मवर ती कशी तरी पोहोचली. हा तिच्या आयुष्यातला एकटीचा प्रवास होता. तिने प्लॅटफार्मवर भिरभिरती नजर फिरविली, तिला गावातील एकही स्त्री नजरेस पडली नाही. मग तिच्या लक्षात आलं की सगळ्या बाया अगोदरच्या रेल्वेने निघून गेल्या होत्या.

रेल्वेचं तिकीट हातात पकडून सखू प्लॅटफार्मवरच्या येणाऱ्या–जाणाऱ्या गाडीबद्दल माहिती दाखवणाऱ्या डिजिटल बोर्डसमोर उभी होती. एकेक आकडे वाचून आपल्या तिकीटावरच्या गाडीनंबरशी जुळवून पाहत मनात पुटपुटली, मले तं आता समजवूनच नाही रायले नां बाप्पा. ह्या बोर्डावर तर अलगच आकडे दिसते. शून्य ते चौकोन – चौकोन हाये, आपलं तं गोल–गोल असते. सहाचा आकडा जुळून भलताच दिसते बाई, तिकीटावरच्या आकड्याले कोणताच आकडा जुळून ना राहिला, आता काय करू बाप्पा, सोबतच्या बाया पण चालल्या गेल्या, या डिजिटल अंकानं माझा घात केला सखू पार गोंधळून गेली, तिची अशी झालेली अवस्था बाजूचा प्रवाशी बघत होता. त्याने तिला विचारले,

''कुठे जायचे आहे काकी,

पंढरपूरला सखू उच्चारली, त्याने तिच्या जवळचे तिकीट आपल्या हातात घेत. बोर्डवर चेक केले. त्याला धक्का बसला, कारण ती गाडी केव्हाच निघून गेली होती.

काकी तुझ्या या तिकीटावरच्या नंबरची गाडी तर, आताच समोरून निघून गेली असे सांगताच सखूला फार वाईट वाटले. आपल्याला हे डिजिटल अंक न समजल्यामुळे आपली गाडी निघून गेलो.


''माझ्या पोरानं मोठ्यायानं तत्कालचं तिकीट काढून देलं, पैसे पण गेले आज पंढरपूर पण आचं राहायलं! बाई आता मले काही करून हे डिजिटल अंक म्हंते का फिजिटल अंक शिकूनच घ्या लागन.''

असे मनाशी ठरवून, एक, एक पायरी जड अंतःकरणाने उतरून घराचा रस्ता धरला.

सखू रात्रीला अनिलच्या घरी गेली. आता तिला काही ही करून ते डिजिटल अंक समजून घ्यायचे होते, अनिल दररोज रेल्वेने प्रवास करीत होता. काकीला पाहून सखूला अनिल म्हणाला, '' काय सखूमाई कशी काय इकडे, तुझ्याच घरी आल्ती का? बरे? अरे अनिल तू मले रेल्वेच्या बोर्डावर दिसणाऱ्या डिजिटल अंकाची माहिती दे,'' अनिलला रेल्वेच्या प्लॅटफार्मवर झालेला गोंधळ समजावून सांगितला.

अनिल झालेला प्रकार समजवून गेला. त्याने सखूला शून्य से नऊपर्यंतचे सर्व डिजिटल अंक समजावून सांगितले. बारकाईने लक्ष देऊन आपल्या वहीवर लिहून घेत होती.

घरी गेल्यावर अनेक वेळा ते अंक वहीवर रेखाटले, काही दिवसातच ती पुन्हा स्वतः रेल्वेचे तिकीट काढून प्लॅटफार्मवर आली. तिकीटावरचे नंबर आणि बोर्डवरचे नंबर तिला एकदम कळाले. डिजिटल साक्षरतेमुळे तिच्या जीवनाला एक नवी भरारी मिळाली आणि तीर्थयात्रेचा प्रवाससुद्‌धा सुखमय झाला.




# 20. हागणदारी मुक्ती (स्त्रियांनी केलेला उठाव)

हिवरखेड गाव नावाप्रमाणेच हिरवेगार दिसणारे छोटेसे खेडेगांव, चहूबाजूने उंचची उंच झाडे डौलात उभी होती. त्याला कारण म्हंजे, त्या गावातून झुळ झुळ वाहणारी नदी. त्याच नदीच्या भरवशावर गावातील प्रत्येक स्त्री-पुरुष, गुरे-ढोरे यांची तृष्णा भागवत होता. एकंदरीत पाहता ती नदी त्या गावची 'जीवन दर्शनी' होती.

अगदी काठावरच्या रस्त्याने शेतीच्या कामाकरिता गावातील लोक ये-जा करीत होती. अशा सुंदर गावाला एक अस्वच्छेती कीड लागली. ती म्हणजे नदीच्या काठावर बसून शौच करीत. त्यामुळे नदी आणि नदीतील पाणी घाण होत होते. त्यातून दुर्गंधी पसरली होती. याच कारणामुळे गावात नेहमी साथीचे रोग पसरायचे. लोकं कावीळ, डायरिया, गॅस्ट्रो, मलेरिया अशा अनेक रोगाने त्रस्त असायचे. कोणीच आपल्या घरात संडासची व्यवस्था केली नव्हती, पुढाकार घेणार कोण, ही घाणेरडी सवय जाणार कशी याचा विचार गावातल्या राधा अक्काला नेहमी यायचा. ती शिकली सवरली होती, परंतु गावची सून असल्यानं एकदम भाष्य करणं तिला जमत नव्हतं! एके दिवशी तिने गावातील काही स्त्रियांना एकत्र करून नदीकाठी जाण्याचं ठरवलं. तो दिवस उजाडला नदीच्या काठावर बायकांचा गलका दिसताच संडासला बसलेल्यांची दाणादाण उडाली, हे पाहून राधाक्का ओरडली, 'अरे तुम्हाले काही लाज शरमा आहे का? नुसते नदीवर हागाले बस्ता! अरे आमाले याच नदीचं पानी रेतीत चिरे करून न्याय लागते ना! असं करून किती पाप करान सारे, त्यापेक्षा घरी संडास बांधा, त्याच्यासाठी सरकार पैसे देते ना'' तो पर्यंत अर्धेअधिक लोक पळून गेले होते.

आता या सगळ्या स्त्रियांनी गावाला हागणदारी मुक्त करण्याचा चंग बांधला, सकाळ/संध्याकाळ जो तांब्या घेऊन दिसेल त्यांना हटकने चालू केले. घराघरात जाऊन, बाहेर संडासला बसणे आणि घाण करणे किती वाईट आहे, याबद्दल प्रत्येकाचे मन वळविणे चालू केले. काही दिवसांतच स्त्रियांच्या प्रयत्नाला यश आले, काहींनी लाजेने तर काहींनी, बाहेर संडासला बसण्याच्या वाईट सवयीपासून मुक्ततेसाठी सरकारच्या पैशान घरात संडास बांधायला व तो वापरायला सुरुवात केली.



काही लोकांना घरी संडास बांधणं काही पटलं नव्हते. ते एकमेकांना म्हणत होते.

''पाय गण्या मले, सकाळी मोकळे दाटो, बाहेरच बरे वाटते. तूही चालनं नदीकाठावर हागाले.'' रमेश म्हणाला.

''या बायकाईले काय समजते, जे गोष्ट बाहेर कराची, थे म्हंते घरात करा.'' रमेश म्हणाला.

अशा लोकांची जिरवण्यासाठी स्त्रियांनी आपला हागणदारी मुक्तीचा लढा अधिक तीव्र केला. आता जो घाण करणारा दिसेल त्याला अडवणे त्याच्या हातात फुलं देणे अशी प्रथा सुरू केली. काही दिवसांतच परिणाम दिसून आला.

आता गावात सगळ्यांनी संडास बांधले, कुणीच घाण करीत नव्हता. नदी हळूहळू स्वच्छ व्हायला लागली होती. गावात रोगराई नावालाच उरली होती. राधाक्काच्या 'गाव हागणदारी मुक्ती'च्या कार्याची दखल सरकार दरबारी घेतली गेली आणि त्या वर्षाचा पुरस्कार सुद्धा मिळाला.

**श्रेय नामावली**

- **लेखन व निर्मिती सहभाग :**

  **डॉ. सुचिता राऊत,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्रीम. माधुरी देशमुख,** अध्यापकाचार्य,
  महिला आश्रम अध्यापक महाविद्यालय, वर्धा.
  **श्री. शीतल वडनेरकर,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. शाळा क्र. २, वेरूळ (कन्या) ता. आर्वी, जि. वर्धा.
  **श्रीम. शुभांगिनी वासनिक,** शिक्षिका,
  जि. प. शाळा, सुलतानपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा.
  **श्रीम. दीपा गिरी,** शिक्षिका,
  जि. प. प्राथ. केंद्र शाळा, तळेगाव (टा.), ता. वर्धा, जि. वर्धा.
  **श्रीम. नेहा साळुंखे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.
  **श्री.सूरज सावळे,** सहा. शिक्षक,
  शासकीय विद्यानिकेतन, जि. धुळे.

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

**राज्य साक्षरता केंद्र**

# नवभारत साक्षरता कार्यक्रम

# उजास

नवभारत साक्षरता अभियानाद्वारे
घराघरात वाहतील साक्षरतेचे वारे.




साक्षरतेकडून समृद्धीकडे...
राज्य साक्षरता केंद्र,
महाराष्ट्र, पुणे